
# संजय बनसोडे

# दुष्काळी वावटळ



# दुष्काळी वावटळ

संजय लिंबाजी बनसोडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# दुष्काळी वावटळ

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# दुष्काळी वावटळ (कादंबरी)

संजय लिंबाजी बनसोडे

कवी लेखक पत्रकार

रा. चोंढी ( खु )

ता. सेनगाव, जि. हिंगोली

हल्ली मुक्काम

1195/ 002 नकुल गायकर बिल्डिंग

पाटील आळी, हनुमान मंदिर जवळ

घणसोली गाव, नवी मुम्बई 400701

मोबाईल नंबर : 9819444028

email id: sbansode40@gmail. com

blog id : sanjaylbansode. blogspot. in

facebook id : facebook. com/sanjay. bansode. 31542

लेखकाची ओळख

संजय लिंबाजी बनसोडे



1) "सम्यक वर्तमानकाळ" या मासिक वृत्तपत्राचे नवी मुम्बई प्रतिनिधी.

2) "देऊ वादळाशी लढे" हा आंबेडकरी कवितासंग्रह प्रकाशित.

3) गीतकार म्हणुन सात गाणे आणि कथेतून साकारलेल्या दोन शॉर्टफिल्म.

4) देशोन्नती वृत्तपत्रात 100 पेक्षा अधिक कविता प्रकाशित. दैनिक सम्राटमधे अनेक लेख प्रकाशित.

5) अनेक कवी सम्मेलनमधे सहभाग.

भीम लेखणी विचारमंच या आंबेडकरी साहित्यिक ग्रुपचे संस्थापक.

या ग्रुप मार्फत मुंबईत विविध ठिकाणी कवी संमेलनाचे आयोजन.

त्रिरत्न सामाजिक संस्था (कल्याण ) या संस्थेमार्फत " भीम लेखणी विचारमंच" या माझ्या साहित्यिक ग्रुपला "समाजरत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले..

कुष्ठरोगी दिन-दलित सेवा संघ, बौद्ध एकत्रीकरण आणि मातृभूमी सेवाभावी संस्थेच्या वतीने माझ्या कार्याची दखल घेऊन सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १४ फ़ेब्रुवारी २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## सौ शशी डंभारे



- दुष्काळी वावटळ -

लेखक संजय बनसोडे हे "दुष्काळी वावटळ " च्या रुपात एक सकस पुस्तक वाचकांच्या हाती देत आहेत. पहिलेच पुस्तक असले तरी लिखाणात कुठेही नवखेपणा नाही, अवघडलेपण नाही. शेतकरी जीवनावर भाष्य असले तरी ओढून ताणुन, अनावश्यक ग्रामीण भाषेचा सोसही नाही उलट भाषा शैली उत्तम.

60 वर्षाचा शेतकरी, ज्याची मुलं शहरात स्थायिक झालेली आहेत. मुलं स्वताही शहरी जीवनाशी जुळवून घेत, स्थिरावण्याच्या प्रयत्नात आहेत. म्हाता-या आई वडिलांना त्यांनी खेड्यात राबण्यासाठी एकटे टाकलेले नाही तर आई वडिलांचीच नाळ काळया मातीशी घट्ट जुळलेली असल्याने तेच या काळ्या मातीचा पदर न सोडता शेती आणि शेतीविषयक समस्यांशी निष्ठेने झुंजत आहेत असा विषय लेखकाने निवडला असल्याने एक वेगळाच दिलासा मिळतो. अन्यथा ग्रामीण, त्यातही शेतीविषयक कथांमधे अनेक वेळा भावनीक आर्तक्य असतं. लेखकाने ते टाळलं आहे याबद्दल त्याचं सर्वप्रथम अभिनंदन.

कथेच्या सुरुवातीला बैलजोडीतील एक बैल अपंग झाल्याने कथेचा नायक लिम्बा म्हातारा विचलीत दिसतो मात्र विचाराने, मनाने तो अजीबातच खचलेला नाही. पूर्ण कथेत लेखकाने हा बाज शेवटपर्यंत राखला आहे. शेतकरी म्हणून या कथेचा नायक कष्ट करताना दिसतो, तडजोडी स्वीकारताना दिसतो, निराश मात्र कुठेच दिसत नाही.

ही कादंबरी लिंबा म्हातारा आणि त्याला त्याच्या शेतीत पिकासाठी हवा असलेला योग्य परिमाणाचा पाऊस या दोनच मुख्य पात्रांवर आधारीत आहे.

पहिल्या टप्प्यात पाऊस येण्यापूर्वीची लिंबा म्हाता-याची संपूर्ण तयारी म्हणजे सर्वप्रथम जवळ असलेल्या एका बैलाच्या जोडीला दुसरा बैल विकत घेणे, त्यानंतर जमीनीची डागडूजी, बियाणांसाठी उसनवारी, कर्जदारी याचे वर्णन येते

पुढे पाऊस आल्यावर आधी झालेला आनंद, त्यानंतर पावसाची दडी, आणि त्यानंतर पावसाची मनमानी, पुर, आलेल्या रोपांची धुळधाण असे चित्र

त्यानंतरही जी काही रोपं वाचली त्यावर समाधान मानून पुढील कामं मन लावून केल्यावरही संकंटं थांबत नाहीत. अळयांचा - किंडयांचा फेरा येणे.

कथा वाचताना शेतकरी खरंच शेतीशी निगडीत या इतक्या समस्यांना कुठे - कुठे नी कसा - कसा पुरणार हा प्रश्न वाचकाच्या मनात आल्यावाचून राहत नाही.

ग्रामीण जगातले, आजूबाजूचे सगळे आधार संपल्यावरच शेतकरी आपल्या शहरातल्या मुलांकडे आपली व्यथा वाटून घेऊ इच्छीतो हे ही महत्वाचे. आणि शहरातल्या नातेवाईकांनाही मदत देणे शक्य नाही हे कळल्यावर तो त्यांच्या विरुध्द जराही त्रागा करताना दिसत नाही. हे सगळे मला सध्याच्या आतताई कुटूंबव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर फार महत्वाचे वाटतेय. त्यासाठी मी लेखकाला मनापासून धन्यवाद देते.

किटकनाशकाचा प्रश्न लिंबा म्हातारा आपल्या म्हातारीच्या पाटल्या आणि बांगडया विकून निकाली काढतो तेव्हा एक लक्षात येते की हाडाच्या शेतक-याला, आपली जमीन आपले पीक यापेक्षा जास्त नशा कशाचीच नसते. त्याच्यासाठी त्याची आळंदीही शेत, विठूमाऊलीही शेतच.

शेतक-याची संकंट थांबत नाही. त्याला मोसमभर पाऊस मित्रासारखा वागायला हवा असतो, पण पाऊस लहरी. पाऊस आणि शेतकरी यांची घासाघीस कादंबरीभर थांबलेली दिसत नाही.

शेवटी पावसाने दगा दिलाच ज्या झाडाला 50-60 शेंगा यायला हव्या त्या झाडाला निसर्गाची उन- पावसाची सगळी आक्रमणे पचवता केवळ 5-6 शेंगा उरल्या आणि 30-35 पोतं धान्य मिळणा-या लिंबाला या वर्षी 4 पोती धान्य मिळालं. दुष्काळात तेरावा महिना तसा दिवाळसण, माहेरवाशीणी मुली नी नातवंडासाठी हाती असलेलं सगळं संपवून लिंबा पुरता कफल्लक होतो.

पण तरी ही हा काळया मातीतला रांगडा म्हातारा परिस्थितीने खचून जात नाही. पेरणीसाठी, बी-बीयाणासाठी घेतलेले कर्ज, कर्ज घेताना दिलेला शब्द वाया जाऊ देत नाही. आणि खूप आशेने, उत्साहाने, देवावर, पावसावर विश्वास ठेवून विकत घेतलेला बैल जुन्या बैलासकट विकायला बाजार गाठतो असा हा एकूण कादंबरीचा प्रवास.

बैल खरेदी पासून बैल विक्रीपर्यंतचा एका झुंजारु शेतकऱ्यांचा एक साधासा प्रवास. इतकेच कथाबीज. पण लेखकाने पूर्ण शक्तिनिशी आपल्या लेखन शैलीने वाचकाला या प्रवासाशी जुळवून ठेवण्याचे कसब राखले आहे.

लिंबा म्हाता-याला बैल घेण्याकरीता धोंडु शेतक-याने केलेल्या मदतीसारख्या अनेक प्रसंगात ग्रामीण समाजाचे खडबडीत तरी मोहक दर्शन वाचकांपर्यंत पोहचवण्यात लेखक यशस्वी झाला आहे. लेखकाने उभा केलेला बैलबाजारही लेखकाच्या एकंदर निरीक्षण शक्तीचे उत्तम उदाहरण आहे.

दलालांची झुंबड, बैलाचे दात मोजून त्याचे वय ठरवणे वगैरे वर्णन वाचल्यावर शेतक-यांचे अनुभव विश्व व त्याच्या अचूक अटकळी यांचा वाचकांना सहज प्रत्यय येतो.

बाजारात एकच बैल विकायला घेऊन बसलेल्या दुस-या शेतक-याचे दु:ख लिंबाला अचूक कळते आणि तो त्या गरीब शेतक-यांचाच बैल विकत घेतो

यावरूनही ग्रामीण भागातील किंवा एकुणच अडचणीत असलेल्या शेतक-यांची नाळ एकमेकांशी कशी जुळलेली असते हे लेखकाने अचूक टिपले आहे

याशिवाय निसर्गातील सूक्ष्म आणि ढोबळ असे दोन्ही बदल अतिशय सुंदर रित्या लिखाणात उतरलेले आहे.

" आग ओकणारा सूर्य अंगाच्या लाही लाही करणाऱ्या त्या सूर्याच्या लाव्हा आणि झाडाचे पानही न हलणारे ते स्तब्ध वारे या सा-यात आज बदल होताना दिसला पावसाळ्याची चाहूल लागली होती आज तो तेजमय सूर्य ढगांसोबत लपाछुपी खेळत होता मंद झालेल्या वाऱ्याने आपले खरे रूप दाखवायला सुरुवात केली होती त्याच्या तालावर सारे झाडे, पक्षी आनंदात नाचत व गात होती कोकिळ पक्षी कुहू कुहू करीत आपल्या मंजूळ आवाजात पावसाला धर्तीवर आमंत्रित करीत होती इतर पक्षी मात्र आपले घरटे बांधण्यात मग्न होते, भेटेल त्या वाळलेल्या गवताची काडी घेवून झाडावर फांदीच्या आडोशाला आपले नविन घरटे बांधित होते, झाडांच्या बुडात मुंग्यांनाही घाई झाली होती त्याही झाडाच्या बुडात घर बांधणीसाठी खोदकाम करीत होत्या दुपारची वेळ सूर्य ढगाआड थंड थंड वाहणारे वारे हे बघून वानरंही या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत आपला आनंद व्यक्त करीत होते "

तसेच,

" शेतकऱ्याने काळ्या आईच्या पोटात जी बियांची पेरणी केलेली असते त्यातही तासातासाने बदल होत जाते प्रथम बी फुगायला लागते त्यामुळे बियाच्या वरचे आवरण नष्ट होते हळूहळू आत दडलेला ईवलासा अंकुर त्या बिया मधून बाहेर येण्याचा प्रयत्न करतो दोन तीन दिवसात तो आपले दोन्ही हात जोडीत काळ्या आईच्या पोटातून बाहेर येतो नवजात लेकरा सारखा "

या वर्णनांत लेखकाची निसर्ग-बदलाबाबतची सूक्ष्म नजर वाचकालाही समृद्ध केल्याशिवाय राहत नाही.

ही कादंबरी वाचताना लेखकाचे यासाठीही अभिनंदन करावेसे वाटते की शेतीशी अजीबात संबधीत नसलेला वाचकही शेतीबद्दल सगळी

माहिती या कादंबरीतून घेऊ शकतो. लावणी, पेरणी, मळणी, बी पेरल्यापासून तर धान्य घरात येईपर्यंतची एकूण एक प्रक्रीया या कादंबरीत वाचायला मिळते आणि कुठेच कंटाळवाणी होत नाही. कृषी विषयक अत्यंत महत्वपूर्ण माहिती कथास्वरुपात देण्यात लेखकाला यश आले आहे.

घनशाम मारवाडी, मुनीम आणि एकुण व्यवहार या प्रसंगात शेतकरी आणि सावकार यांच्यातील संबंधही फारसे कडवट नसून बरेचसे माणुसकीचे दिसतात. लेखकाच्या लिखाणातला हा प्रामाणिकपणाच वाचक म्हणून मला फार भावला. कसला म्हणजे कसलाच दुराग्रह नाही. अट्टाहास नाही

सरळ, साधे लिखाण. आपला प्रवाह सांभाळत.

आजूबाजुला चर्चेत असलेल्या शेतक-यांची विपन्नावस्था, आत्महत्या अशा नकारात्मक वातावरणात भांडवल म्हणून आपल्या कथाबीजाचा वापर न करता ग्रामिण माणसांतले आपआपसातले भोळेपण रेखांकित करणारा हा लेखक पुढेही आपल्या लिखाणाने वाचकांना समृध्द करेल यात शंका नाही.

....

सौ शशी डंभारे

नागपूर

# राहुल सिद्धार्थ साळवे

शुभेच्छा !



खरतर, शब्दांची जहागिरी असणार्या नवाबाला, माझ्या सारख्या शब्दात रमणर्या फकिराने त्याच्या फाटक्या झोळीतून शुभेच्छा देण्या इतपत मी नक्कीच मोठा नाही. पण मित्राच्या आग्रहा पुढे उगाच पिकलेल्या चार केसांची तुटक तुटक असणारी दाढ़ी खाजवत मोठेपणाचा आवही ठरवून आणता येत नाही. म्हणून या कादंबरीतले एक पान माझ्यामुळे अधिक बेरजेचे होत आहे, त्याबद्दल मित्र संजयजी बनसोडे यांचे आभार !.

जाणिवांच्या दृढ़ भावनेतून लेखक, कवी जन्माला येत असतो असे कुठे तरी वाचनात आले होते, आणि ते सत्यच आहे. परंतू, त्या पलिकडे जाऊन घडलेल्या मोजक्या घटनांचे आपल्या आयुष्यात किती महत्वाचे स्थान आहे? याची जाण, याचे भान असलेला प्रत्येक माणूस मला नेहमीच खर्या अर्थाने 'जिवंत' वाटतो. त्यातलाच हा एक लेखक, कवी मित्र म्हणजे संजयजी बनसोडे.

सप्टेंबरच्या रखरखत्या उन्हात भर दुपारी घामाघूम होऊन संजयजी त्यांच्या कादंबरीची टंकलिखित प्रत घेऊन, मला भेटण्यासाठी माझ्या घरी आले. बसले. पाणी घेतले. आणि पहिलेच वाक्य बोलले, "कादंबरी  छापायची आहे". हे एकच वाक्य त्यांच्यातल्या खर्या लेखकाची ओळख करून  देण्यास मला पुरेसे होते. ते येण्याआधी असे वाटले होते की, भरगच्च शब्दांनी सजवलेली, रंगवलेली खोटेपणा पण अगदी खर्या सारखी दर्शवणारी १५०-२०० पानांची जाडजुड़ संहिता असेल. पण, हातात पडली ती ४०-५० पानांची साधी सोपी पुस्तिका. जिला खरे पणाचा आणि आपल्या मातीचा गंध होता. आणि तेव्हाच जाणवले की, यातला शब्द न शब्द खरा आणि सच्चा असणार.

'दुष्काळाची वावटळ' या दोन अंकी शब्दाच्या नावानेच मी सुन्न झालो होतो. पण, पुढे याला जोड देणारे 'लिंबा म्हातार्याची कथा' हे वाक्य कुठे तरी मला काल्पनिक

दिशेला घेऊन जात असतानाच, संजयजी उद् गारले, " लिंबा म्हातारा म्हणजे माझे वडिल". मी ऐकताच भानावर आलो. वाचत गेलो. प्रत्येक शब्द न शब्द, माझ्या नजरेआड घडलेला संजयजींच्या वडिलांन सोबतचा हरएक क्षण माझ्या डोळ्या समोरून पुढे सरकत  नेत होता. इतकं वास्तवरूपी  संजयजींनी त्यांच्या शब्दात मांडले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतूकच.

खुप खडतर प्रवासाच्या चिमटीतून मुक्त होत, आज अखेर संजयजी त्यांची कादंबरी वाचकांच्या हवाली करत आहेत, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मितभाषी स्वभावाचा असलेला हा लेखक, कवी मित्र त्याच्या काव्यातूनही अगदी असेच वास्तवाचे भान ठेवून समाज मनावर आसूडच ओढतो. त्याचा नजरानाही त्यांनी काव्यसंग्रहाच्या रुपात लवकरच आणावा ही विनंती.

या कादंबरीच्या माध्यमातून  साहित्यिक आभाळात आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी झेपावलेला हा आदर स्थानी असलेला पक्षी, इथल्या प्रस्थापित व्यवस्थेवर शब्दांचे अधिराज्य गाजवेल यात शंकाच नाही. त्यांच्या लेखनीला नव निर्मितीचे, परिवर्तनाचे असंख्य सुर गवसू दे, हीच एक मित्र म्हणून मनोकामना. त्यांच्या पुढील प्रवासास शुभेच्छा देताना, माझ्या रचनेतील दोन तोडक्या मोड़क्या ओळी त्यांच्या प्रति मांडून, माझे हे रटाळवाणे शुभेच्छा पत्र इथेच संपवतो.

" घे झेप तू उंच नभी
भेदून टाक काळोख हा !
बनव तुझी ओळख नवी
स्पर्शूनी तू सुर्यास त्या! "

- राहुल सिद्धार्थ साळवे
बी-३/ १८, २ मजला, रूम नं- ३
अष्टभुजा सोसायटी, सेक्टर-१७,
वाशी, नवी मुंबई.
९९६७११६६८७



**<u>तहान भुकेची पर्वा न करता रात दिवस शेतात राब राब राबणाऱ्या माझ्या आई वडिलांच्या चरणी</u>**

प्रिय बापू...,

भाकरीच्या शोधात तुमच्यापासून दुरावलेल्या लेकराविषयी तुमच्या मनात आजही तितकीच माया आहे, जितकी हे लेकरू पाच सहा वर्षांचं असताना होती.

आज सत्तर वर्षाच्या उंबरठय़ावर असताना सुध्दा माझ्या पाठीवर कणखरपणे हात ठेऊन जेंव्हा मला तुम्ही म्हणता, "पोरा, काळजी करू नको... नौकरी गेली तर गेली, आपलं शेत हाय जिंदाबाद. तु फक्त ये गावाकडं. बाकीचं मी पाह्येतो..... !"

तेंव्हा, आजही तुमच्यापुढं मी नऊ दहा वर्षाचा असल्यासारखेच मला वाटते. शेवटी तुम्ही बाप माणूस, स्वतःला दारिद्री नावच्या विस्तवाचे कितीही चटके लागले तरी पोराला त्या विस्तवाचा शेक सुद्धा लागू द्यायचा नाही.

बापू, अंतःकरणातून तुम्हाला एक गोष्ट सांगावीसी वाटते. जी मी तुमच्या समोर कधी बोललो नाही किंवा बोलण्याची हिम्मत केली नाही,

आता मला तुमची फार चिंता वाटते. थोडे दिवस मला तुमची सेवा करण्याची संधी द्या. तुम्ही या मुम्बईला... शेतीचं काय ते आपण नंतर बघू. पण आता या वयात दुष्काळाचे अन् मेहनतीचे चटके सोसणे बंद करा.

तुम्ही आम्हांला, स्वतः उपाशी राहून घाम गाळून लहानाचे मोठे केले पोटाला पोटभर दिले.

आता म्हातारपणी थोडं लेकराच्या कमाईचं खा आणि आराम करा....

***संजय बनसोडे***

# आभार

सर्वप्रथम मी 'ई साहित्य प्रतिष्ठान'चे अगदी मनापासून आभार  मानतो.

कारण, त्यांनी माझ्यासारख्या नवख्या साहित्यिकांची, तोडक्या मोडक्या शब्दात पण अंतःकरणातून लिहलेली कादंबरी प्रकाशीत केली आणि कादंबरीला न्याय दिला. मला साहित्य क्षेत्रात एक नामी संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल.

तसेच राहुल सिद्धार्थ साळवे दादा तुमचेही मनापासून आभार..

कारण, तुम्ही माझी ही कादंबरी वाचून मला प्रोत्साहन दिले नसते तर कदाचीत ही कादंबरी बाहेर आलीच नसती. दयासागर वानखेडे सरांचेही मी मनापासून आभार व्यक्त करतो..

ओळख नसतांनाही मित्राच्या एका शब्दावर होकार देऊन, माझ्या या छोट्याशा कादंबरीला प्रस्तावना लिहून सुशोभित करणाऱ्या सौ. शशी डंभारे मॅडमचेही मनःपूर्वक आभार..

माझे ऑफीस मित्र पदमाकर चिटणीस सर, हेमंत गाडगीळ सर, अविनाश म्हात्रे सर, संदीप पवार सर, प्रमोद खाने सर, महेंद्र इंगळे सर, राहुल गायकवाड सर यांचेही मनापासून आभार...

तसेच कारवा टीमचे कवी गायक प्रमोद पवार, शरद नरवाडे, विनोद पवार, बाबासाहेब जाधव, अमोल कांबळे यांचेही मनापासून आभार व्यक्त करतो.

*संजय बनसोडे*

*दुष्काळी वावटळ या कादंबरीतील सर्व पात्रे व घटना काल्पनिक असून त्यांचा कोणाही वास्तव व्यक्तींशी साम्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.*

मे महीना संपत होता शेतातील काम ऊरकत आली होती. मोठमोठी ढेकळे पाण्याची वाट बघत होती. ओसाड झालेल्या झाडांना नवीन पालवी फुटत होती. जागोजागी पळसाच्या लाल सुंदर फुलांनी ओसाड झालेली जमीन सुंदर सजलेली दिसत होती... नव्या नवरी सारखी.

दुपारची वेळ होती सूर्याच्या आग ओकणाऱ्या लाव्हा अंगातील रक्त पीत होत्या. अशा सळसळत्या उन्हात ‘लिंबा ‘म्हातारा आणि त्याची बायको ‘बायनाबाई ‘शेतात आंब्याच्या झाडाखाली कपाळाला हात लावून एकटक मातीकडे पाहत बसले होते. त्यांच्या शेतातील काहिही काम झाले नव्हते. तुरीचे सोयाबीनचे धसाडे तसेच रानात उभे होते.

पेरणी जवळ येत होती. त्यामुळे लिंबा म्हाताऱ्याची चिंता वाढतच चालली होती. हे बघून म्हातारीने पिशवीत हात घातला, आणि एक सुपारी काढली, अडकत्यात तिचे चार पाच तुकडे केले, त्यातला एक तुकडा लिंबा म्हाताऱ्याच्या हातात दिला व बोलली काही काळजी करू नका! शेतीवर या वर्षी बँकची सोसायटी (शेतीवर बँकेतून कर्ज )काढा आणी या घेऊन एक बैल बाजारातून !

हे ऐकून लिंबा म्हातारा हसत हसत म्हणाला,

"अगं दोन वर्षी झाली सोसायटी काढून !तीच आणखी जमा केली नाही दुसर्यांदा काय तंबुरा देणार आहे ती बँक ? पहिल्या सोसायटीचेच व्याज वर व्याज चढायलं ! “

लिंबा म्हाताऱ्याला दोन मुले व चार मुली होत्या. चारीही मुलींचे कधीच हात पिवळे झाले होते. नातवंड झाली होती काही नातवंडाना पणतू ही झाली होती. त्याच्या दोन मुलांचेही लग्न झाले होते. लिंबाला बाप जाद्याची सहा एकर कोरडवाहू जमीन वाट्याला आली होती. त्या सहा एकर जमिनीवरच त्याचा संसाराचा गाड़ा आजवर रेटत आला होता. पण, मुलांचे लग्न झाल्यावर, घरात सुना आल्यावर त्यांचे या सहा एकर जमिनीवर काही भागत नव्हते म्हणून दोन्हिही मुले कामधंदा शोधण्यासाठी मुंबईला गेली आणि तिथेच स्थाईक झाली.

लिंबा म्हाताऱ्याला मात्र या काळ्या आईची सेवा जन्मालाच पुजलेली  होती. पाच वर्षाचा होता तेंव्हापासून या काळ्या आईची सेवा करण्यास त्याने सुरवात केली. आज साठ वर्षाचा आहे.  तरी कणखर. एखाद्या नौजवान युवकाला लाजवेल अशा चपळाईने आजही तो काळ्या आईची सेवा करतो. एखाद्या लेकरा प्रमाणे.

मोठ्या मुलाने  पई पई गोळा करून त्याला  शेतीतील काम करण्यासाठी एक बैल जोड विकत घेऊन दिला होता. तेंव्हा तर म्हाताऱ्याचा आणि  म्हातारीचा आनंद गगनालाही भेदून गेला होता. जसे घरात एखादे नवीन बाळ जन्मा येते आणी त्या घरात आनंद होतो अगदी तसाच. त्याला कारणही तसेच होते येवढ्या वर्ष त्याला पेरणीसाठी याच्या त्याच्या घरात बैल मागण्या जावे लागत असे पण, त्याला आता हक्काची बैल जोड़ी मिळाली होती. त्याच्या मालकीची.

तो  बैलांची सेवा अगदी आपल्या  मुलाप्रमाणे करीत होता. काम असो नसो त्यांना खुराक, उन्हाळा असो पावसाळा असो त्यांना हिरवागार चारा, त्यामुळे बैलही त्यांच्या हाताखाली दोन वर्षातच धष्ट पुष्ट झाली होती.. काम कमी व सोय जास्त असल्यामुळे डरकाळी फोडायला आणि  टक्कर खेळायला गावात नंबर एक होती. समोर कितीही मोठी बैल जोड़ी असली तरी त्यांना हरवल्या शिवाय राहणार नाही.

एक दिवस लिंबा म्हातारा बैलगाडी घेवून शेतात गेला. आणि  नेहमीप्रमाणे धुऱ्यावरच बैलगाडी सोडली तिथेच पळसाच्या झाडाला त्यांनी बैल बांधले व कुऱ्हाड टिकास घेवून खालच्या शेतात काम करण्यासाठी गेला. बैल रस्त्यावर बांधल्यामुळे तेथून दुसऱ्याही बैलांची ये-जा होती. जो पण बैल त्या रस्त्यांनी जात होता, त्या बैलाला लिंबा म्हाताऱ्याचे बैल टक्कर खेळण्यास आमंत्रित करीत होते. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे सारे बैल मोकाटच होते. त्यांच्या मागे कुणी त्यांचे मालक नव्हते, दिवसभर चरायचे आणि संध्याकाळी घरी परतायचे हेच त्यांचे सत्र होते. रस्त्याने जाणाऱ्या एका बैलजोडीने त्या बैलांचे आमंत्रण स्वीकारले व धावतच त्यांच्या अंगावर गेले व लिंबा म्हाताऱ्याच्या दोन्हीही बैलांना घोळसायला सुरवात केली. लिंबा म्हाताऱ्याचे दोन्हीही बैल बांधून असल्यामुळे त्यांना साधी हालचाल ही करता आली नाही. म्हणून, ते दोन्हीही बैल त्यांच्या माराने जमिनीवर कोसळले. हे बघून खालच्या शेतात काम करणारा लिंबा  म्हाताऱ्याने  पळत पळत येवून त्यांना हाकलून लावले.

पण तो पर्यंत वेळ गेली होती, तोपर्यंत काळानी घात केला होता. त्यातला एक बैल कमरेतून मोडला होता. हे बघून लिंबा म्हातारा ढसा ढसा रडायला लागला, पेरणीचे दिस जवळ येत होते आणि एक बैल निकामी झाला ज्याला स्वतःच्या मुलाप्रमाणे जपले आज तोच बैल अपंग झाला. रडत रडत शेजारच्या शेतात असलेला त्याचा शेजारी आणि चूलत काका महाजी म्हाताऱ्याकडे जावून त्याला घडलेला प्रकार सांगितला तो ही दुःखी झाला. कारण, वेळोवेळी त्यालाही बैलाची मदत होत होती. शेवटी एका बैलगाडीच्या मदतीने त्याला गावात नेऊन ठेवले व काही दिवसांनी त्याला दोन तीन हजार घेवून खाटीकाच्या हवाली केले. त्यावेळेस लिंबा म्हातारा बापाच्या मायेने रडताना दिसला

आता लिंबा म्हाताऱ्याकडे एकच बैल होता. तो एका बैलावर काहीही करू शकत नव्हता. पेरणीचे दिवस जवळ येत होते शेतातील नांगरण, वखरण तसेच राहिले होते म्हातारा व म्हातारी त्याच चिंतेत रानांत आंब्याच्या झाडाखाली बसले होते. पुढची कामे कशी करावी त्याचा विचार करीत होते. म्हातारीने दिलेली सुपारी चघळत चघळत दोघेही उठले. गावच्या विहरीचे प्यायचे पाणी आटल्यामुळे म्हातारी शेतातील विहरीचे पाणी घेऊन जात होती. दुपारचे दोन वाजले होते. उन्हाच्या लाव्हा सळसळत होत्या. झाडावर कीर्रकीऱ्या कीर्रकीरत होत्या. अधून-मधून एखाद्या पक्षाची चिव-चिव ऐकू येत होती. साऱ्यांची राने पेरणीसाठी सज्ज झाली होती. त्या भर उन्हात काळ कुत्रही शेतात नव्हतं. दूर-दूर पर्यंत नजर टाकली तर फक्त ओसाड काळे राण, सूर्याच्या लाव्हा व अधून-मधून येणारी वाऱ्याची झुळूक या व्यतिरिक्त काहिही दिसत नव्हते. हे दृष्य बघून म्हातारी त्याला म्हणाली, “चला लवकर घराला ! आज बोलण्या बोलण्या मधे कधी दुपार झाली कळलेच नाही !”

असे बोलून दोघेही उठले म्हाताऱ्याने बैलाला सोडले, म्हातारीने प्यायचा हांडा डोक्यावर घेतला आणी दोघेही घराच्या दिशेने निघाले. मनात विचाराचे काहूर घेऊन

सकाळ झाली होती घराच्या डाळणावर कोंबडा बांग देत होता पिंपळाच्या झाडावर कावळ्याची किलबिल चालू होती. गोठ्यातल्या गाई नुकत्याच बाहेर बांधल्या होत्या. रात्रभर भुकेनी व्याकूळ झालेली वासरे चर-चर हुंदके देत दुध पित होते. सकाळी सकाळी धोंडु बुद्ध , लिंबा म्हाताऱ्याच्या घरी आला. म्हातारीने त्याला बघताच घरात येण्याचे आमंत्रण दिले . त्याला बसायला पोतं टाकले लिंबा म्हाताराही त्याच्या शेजारी बसला. धोंडजीने खिशातले एक बिडीचे बंडल काढले त्यातली एक बिड़ी लिंबा म्हाताऱ्याच्या दिशेने सरकवली व एक स्वतः घेतली. खिशातली माचिस काढून एक काडी पेटवून बिड़ी पेटवली व तिच काडी लिंबा म्हाताऱ्याच्या बिड़ीला लावली. दोन्ही बिड्या पेटल्या. दोघेही पेटलेल्या बिड्याचे मनसोक्त सूरक्यावर सूरके ओढत होते. तोवर म्हातारीने चुलीत काड्या घातल्या. चुल पेटवली. त्यावर चहा ठेवला. दोंघानाही कप बशीत चहा दिला.

चहा प्यायल्यावर धोंडु बोलला,

"मंग, लिंबा दाजी !

काय ठरवलं बैलाचं ?

बैलाशिवाय तर तुमची शेती पडीकच राहील की,

कोण देणार तुम्हांला बैल ?

काहीही करा पण एक बैल घ्या ! नाहीतर यंदाचा तोंडचा घास जाईल बघा !"

त्यावर लिंबा बोलला,

"होय धोंडबा ! बैलां शिवाय काय खरं नाही बघ !

पण काय करू ? थोडे पैसे कमी पडतात "

"किती ???"

धोंडु बोलला...

"आठ-नव हजाराच खिंडार पडतय बघ!"

लिंबा बोलला....

“पेरणीसाठी घनश्याम मारवाड्याकडे बोलणी करून आलो. तो खत बी देणार हाय हंगामा

पर्यंत 5% व्याजानी

पण आता पेरणीचे दिवस जवळ आल्यामुळे बैलाच्या किंमतीही दुप्पट झाल्या आहेत

. त्यामुळे थोडी चिंता लागली मला !”

त्यावर धोंडु बोलला ..., “काही काळजी करू नका दाजी ! आठ हजारांची मदत मी करतो. तेवढे

आहेत बँकेत मह्याकडे “

“तुम्ही केलेले उपकार मी अजून विसरलो नाही. ”

धोंडबाच्या वयाच्या पंधराव्या वर्षी भयानक दुष्काळ पडला होता. प्यायला पाणी नव्हते. खायाला दाणा नव्हता. त्या भयानक स्थितित धोंडबा खूप आजारी पडला होता. सर्वजण पोटापाण्यासाठी इकडे तिकडे भटकत होते. कुणी धोंडबाकडे लक्ष देत नव्हते. अशा हलाखीच्या परीस्थितीत लिंबा धावून गेला. त्याला डॉक्टरांकडे नेले. ते लिंबाने केलेले उपकार धोंडबा अजून विसरला नव्हता. तेंव्हापासून लिंबावर कुठलेही संकट आले की धोंडु त्याच्या मदतीला धावून जात असे. आठ हजारांची मदत धोंडु करणार हे ऐकून दोघांना ही आनंद झाला. त्यांच्या डोळ्यासमोर आता नवीन बैल जोड़ी दिसत होती.

“मी मंग आताच तयारी करतो. आज मंगलवार !आज तालुक्यात बैल बाजार !

“धोंडु दाजी एक काम करा तुम्ही मला आजच पैसे द्या मी आजच जातो तालुक्याला !”

त्यावर धोंडु बोलला,

“हो हो लगेच निंघु, ”

मी पण येतो मला तालुक्याला बँकेत जावे लागेल.

मी तिथेच देतो तुम्हांला पैसे !

मी घरी जाऊन कपड़े बदलतो तुम्ही पण या लवकर !

आता लगेच हिंगोलीची एस टी येईल बाभूळगावावरून. “

असे बोलून दोघेही उठले आणी पुढच्या कामाला लागले.

दोघेही बसमधे बसून तालुक्याला हिंगोलीला रवाना झाले.

दोघेही हिंगोली बस स्टेंडला उतरतात धोंडु बॅंकेतून पैसे काढतो. व लिंबा म्हाताऱ्याच्या स्वाधीन करून व त्याच्या कामासाठी निघून जातो. लिंबा म्हातारा दिलेले पैसे कमीजाच्या आत बनियानाच्या खिशात घालतो व झरझर बैलबाजारांच्या दिशेने निघतो. बैल बाजारात सारे दलाल गेट समोर उभे असतात लिंबा म्हातारा आत जाताच, जसे एखाद्या मेलेल्या प्राण्यांवर कुत्री व कावळे तुटून पडतात तसेच, लिंबा म्हाताऱ्यावर साऱ्या दलालांनी झडप घातली सर्व दलाल विनवणी करीत होते,

मामा हा बघा माझ्याकडे नवीन पेटवनिचा जोड़ !

काका हा बघा नवीन गोहरा !

आज्या हा बघा चार खांद्याचा !

आजोबा हा बघा तुमच्या लागीचा गरीब शांत जोड़ !

पण लिंबा म्हातारा त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता एक एक बैलाचे परीक्षण करीत होता, त्यांचे दात बघित होता. त्यांना न्याहळीत होता.

त्या बैल बाजारात जसे दलाल बैल विकतात. तसेच, कुणी कुणी स्वतः ही बैल घेऊन बाजारात विकायला आणतात. असाच एक म्हातारा अन् म्हातारी एकच बैल घेऊन बसली होती. लिंबा

म्हाताऱ्याचे त्यांच्याकडे लक्ष जाते आणी तो सरळ त्यांच्या दिशेने जातो. समोरून बैल बघण्यासाठी ग्राहक येते म्हणून दोघेही उठून लिंबा म्हाताऱ्याचे स्वागत करतात.

“रामराम!”

“रामराम रामराम !”

“कुण्या गावाच पाव्हनं ?

लिंबा म्हातारा बोलतो,

“आडगाव !”

ते दोघे बोलतात,

“बैल विक्री काढला व्हय ?”

किती खांद्याचा आहे ?

बोलता बोलता लिंबा म्हाताऱ्याने बैलाचे दात बघितले त्यावरून लिंबाला म्हाताऱ्याला कळले की बैल थोडा वयस्कर आहे. पण त्यांनी मनोमन ठरवले होते की, बैल हाच घ्यायचा, एक तर बिचारे 30 किलोमीटर अंतर कापून दोघेही पायी पायी येवढ्या लांब आले. आणि दोघेही त्याच्याच वयाचे असल्यामुळे त्याला त्यांच्या प्रति सहानुभूती वाटली.

बैलाचा मालक हात जोडून लिंबा म्हाताऱ्याला बोलला

“तसा म्हंजी हा आमच्या घराच्याच गाईचा हाय !”

“बारा तेरा खांद्याचा !”

“पोरगी खूप आजारी पडली व्हती म्हणून, जावयानी माझ्याच घरी सोडली

तिच्या दवाखान्याच्या खर्चासाठी गेल्यावर्षी जोड़मधून एक विकला होता !

वाटलं शेतात चांगला माल झाला की याला नवीन जोड़ घ्यावा !

पण पावसाने घात केला, आणी या वर्षीच्या खता बियाचे पण वांदे झालेत. अन् या वर्षी

काळ्या आईने पदरात काहीच पाडले नाही !

म्हणून हा पण विक्री काढला !

भाऊ तीन बाजार याला गावावरून पायी पायी घेऊन आलो

कुणाच्या बी पसंत पड़ना म्हणून तीनही बाजार याला वापस घेऊन गेलो !

सर्वाला जवान एक दोन खांद्याचा बैल पाहिजे, बाजारात भेटतात पण ! त्यामुळे आमची पंचाईत झाली भाऊ !"

बोलता बोलता मधेच त्याची बायको बोलली,

"दादा एक दीड हजार कमी द्या पण या बैलाला घ्या हो !"

लय गुणाचा आहे !

गरीब आहे पायाळू आहे !

याला जर आज कुणी विकत घेतले नाही तर सरळ खाटीकाला विकायचे ठरवले आम्ही !

त्यावर लिंबा म्हातारा बोलला,

"बाई काही काळजी करू नका तुमचा बैल मी घेतला !"

"पण इथं लय किलबिल आहे आपण बाहेर जाऊन बोलणी करू"

हे ऐकून दोघांना ही आनंद झाला दोघेही लगबगीने त्याच्या सोबत बैल बाजारा बाहेर पडले.

बाहेर एका मोकळ्या जागेत तिघेही निवांत मांडी घालून बसले. व लिंबा म्हातारा बोलला

"बोला !"

"बैलाचा भाव बोला !"

"पैसे घ्या अन् करा माझ्या हवाली मला बी आता बीस किलोमीटर अंतर कापीत जायचे पायी पायी !"

त्यावर बैलाच्या मालकाने त्याला लमसम किंमत सांगितली,

"पंचवीस हजार !"

"पंचवीस लय झाले भाऊ !"

"एक काम करा वीस हजार घ्या !"

त्यावर बैलाचा मालक बोलला,

"भाऊ असे करू नका. जरासं आमच्या कडे पण बघा अन् तेवीस ला सौदा पक्का करा"

दोघांचीही तेवीस हजारांवर लेनदेन झाली अन् बैलाच्या मालकाने कासरा लिंबा

म्हाताऱ्याच्या हातात दिला आणी मोकळे झाले !

लिंबा म्हातारा लगेच गावच्या दिशेने रवाना झाला. तो थोडे थोडे गावचे अंतर कापत होता. हळूहळू सूर्याचा मोठा लाल गोळा पश्चिम दिशेला जमिनीच्या खाली थोडा थोडा जात होता. लिंबा म्हातारा एका एका गावचे अंतर कापून पुढे पुढे जात होता आता फक्त एकच गाव बाकी होते ते म्हणजे लिंबा म्हाताऱ्याचे गाव सांजवेळ झाली होती सर्वत्र अंधार पसरत होता म्हातारी पायऱ्यावर बसून लिंबा म्हाताऱ्याची वाट बघीत होती. अचानक तिच्या कानावर घागरमाळाचा आवाज आला तसे तिने उभे राहून वर बघीतले तर तीला म्हातारा दिसला ती आनंदात घरात गेली. एक ताट घेतले त्यात देवार्यातला पेटता दिवा घेतला हळद कुंकू घेतलेत पाणी घेतले एक भाकरीचा टुकड़ा घेतला अन् लगबगीने बाहेर आली तोवर बाहेर अंगणात बैल उभा होता. तिने त्याच्या पायावर पाणी टाकले त्याच्या कपाळावर हळद कुंकू लावले त्याला भाकर टाकली आणि ओवाळून त्याला पहिला बैला सोबत गोठ्यात बांधले लिंबा म्हातारा पायी पायी आल्यामुळे थकून गेला होता पण, बैलाच्या आनंदात तो सर्व थकवा विसरून गेला. दोघेही जेवून आनंदात झोपी गेले आता त्यांना पेरणीची आस लागली होती ते फक्त आता पावसाची वाट बघत होते. पेरणीसाठी.

आग ओकणारा सूर्य अंगाच्या लाही लाही करणाऱ्या त्या सूर्याच्या लाव्हा आणि झाडाचे पानही न हलणारे ते स्तब्ध वारे, या साऱ्यात आज बदल होतांना दिसला. पावसाळ्याची चाहूल लागली होती आज तो तेजमय सूर्य ढगांसोबत लपाछुपी खेळत होता. मंद झालेल्या वाऱ्याने आपले खरे रूप दाखवायला सुरवात केली होती. त्याच्या तालावर सारे झाडे, पक्षी आनंदात नाचत व गात होती. कोकीळ पक्षी कुहू कुहू करीत आपल्या मंजूळ आवाजात पावसाला धर्तीवर आमंत्रित करीत होती. इतर पक्षी मात्र आपले घरटे बांधण्यात मग्न होते, भेटेल त्या वाळलेल्या गवताची काडी घेऊन झाडावर फांदीच्या आडोशाला आपले नवीन घरटे बांधित होते, झाडांच्या बुडात मुंग्यानाही घाई झाली होती. तेही झाडाच्या बुडात घर बांधणीसाठी खोदकाम करीत होत्या. दुपारची वेळ सूर्य ढगाआड, थंड थंड वाहणारे वारे हे बघून वानरंही या झाडावरुन त्या झाडावर उड्या मारीत आपला आनंद व्यक्त करीत होते. अशा मंगलमय वातावरणात, लिंबा म्हातारं जोमाने शेतात वखर हाकीत होता. थंड व बदलत्या वातावरणाला बैलेही शिंगे हलवून साथ देत होती. कारण कित्येक दिवसानंतर त्यांना आता हक्काचा हिरवागार लसलसीत चारा मिळणार होता. आणी पाहिजे त्या डपक्यात प्यायला पाणी भेटणार होते. संध्याकाळची वेळ होती काळ्याभोर ढगांनी आकाशात तांडव करण्यास सुरवात केली होती, सर्वत्र अंधार पसरत होता. विजा कडाडत होत्या. हे बघून म्हातारी उरलेले काम तसेच सोडून लिंबा म्हाताऱ्याच्या दिशेने जावून त्याला आवाज देत होती

“अहो !

ऐकले का !

चला आता घराला !

खूप मोठा पाऊस येतो वाटते !”

हे ऐकून लिंबा म्हाताऱ्यानी ही आवरतं घेतलं, पटापट बैले सोडले वखर जुंपून सर्व गाडीत टाकले म्हातारीनीही त्याला मदत केली. गाडीला बैल खांदी घातले दोघेही बैले गाडीत बसले . व घराच्या दिशेने निघाले. तेवढ्यात वरुण राजाचे आगमन झाले, आणि, त्याच्या आगमनाने तहानलेली धरणी एका क्षणात तृप्त झाली. जमिनीच्या व पाण्याच्या मिलनाने सारे शेतकरी आनंदी झाले. सर्वजण रात्री न झोपता रात्रभर पाऊसच बघत होते व पेरणीची तडजोड करीत होते. मुसळधार पाऊस रात्रभर बरसला.

सकाळ झाली होती हलक्या पाऊसधारा चालूच होत्या. सूर्य ढगांच्या आडूनच आपला प्रकाश देत होता. कुत्री भिंतीच्या आडोशाला शेपटीत नाक खूपसून कुडकुडत होती. रात्रभर भिजलेले पक्षी आपले अंग झटकीत चिवचिवत होती. म्हातारी गोठा साफ करीत होती. लिंबा म्हातारा मात्र घरात अंगावर गोधडी घेऊन बी अन् खताचा हिशोब करीत होता. तो मनात विचार करीत होता, आता गप्प बसून चालणार नाही. आता पाऊस पडला, आता लगेच दोन तीन दिवसांनी पेरणीला सुरवात होईल. आता लगेच तालुक्याला जाऊन खत बी आणावे लागेल. लगेच लिंबा म्हातारा उठला. अंगावरील गोधडी काढली मोठ्या भगुल्यात पाणी घेतले. चुली जवळ गेला. दोन सनकाड्या पेटवल्या. पेटत्या सनकाड्या चुलीत घालून त्यावर लाकडे ठेवले. लाकडे पेट घेताच चुलीवर ते मोठ भगुलं ठेवलं, चिलमीचे चार पाच सूरखे ओढले, त्यातला जळलेला तंबाकू थंडा करून डाव्या हातावर टाकून दात घासत घासत तालुक्याला जाण्याच्या तैयारीला लागला. बैलाला पाणी पाजून दोन गवताच्या पेंढ्या गाडीत टाकल्या. बैलाला खांदी घालून सकाळी सकाळी खत बी आणण्या तालुक्याला रवाना झाला.

खत बी नेण्यासाठी घनश्याम मारवाड्याच्या दुकाना भोवती जत्रेसारखी गर्दी झाली होती. सर्वजण आपआपल्या बैलगाड्या, टेंपो, आटो, ट्रक्टर बाजूला उभी करून दुकाना समोर लाइनीत उभे राहून आपापल्या पाळीची वाट बघीत होती. घनश्याम मारवाडी कापसाच्या गादीवर मांडी घालून बसला होता. मोठ्या रजिस्टरवर त्याचा मुनीम सर्वांचा हिसाब किताब लिहत होता. अर्ध्या तासाने लिंबा म्हाताऱ्याचा नंबर आला. नंबर आल्यावर वर जाऊन लिंबा म्हाताऱ्याने रामराम केला, रामराम ऐकून हिशोबात मग्न असलेल्या घनश्याम मारवाड्याची नजर वर गेली,

"कोण ?"

"चोंढीचा लिंबा !"

"ये ये बस !"

हे ऐकताच लिंबा म्हातारा हात जोडीतच त्याच्या शेजारी बसला. नंतर घनश्याम मारवाड्याने मुनीमला आवाज दिला,

"अरे, चोंढीच्या लिंबा बुढ्ढाची लिस्ट काढ !"

जी शेटजी, बोलून मुनीमनी चोंढी गावचे रजिस्टर काढून त्यात लिंबा म्हाताऱ्याचे खाते दाखवले. तसे लिंबा म्हाताऱ्याचे देणेघेणे रोखठोक असे. लिंबा म्हाताऱ्याची मागील थकबाकी नील बघून घनश्याम मारवाड़ी आनंदित झाला व लिंबा म्हाताऱ्याच्या पाठीवर हात टाकून बोलला,

"बोल लिंबा ?"

"यावेळेस तुला काय काय पाहिजे व्याजावर ?"

तसा लिंबा म्हातारा हात जोडीत म्हणाला,

"शेटजी ! गेल्या वर्षी कमी पावसाने माल नाही झाला जेवढा काही झाला होता त्यात लोकांची उधारी चुकती केली. या वर्षी नवीन बैलेही घेतला त्यामुळे मला यावर्षी सारेच खत बियाणे खात्यावर द्या !"

"काही काळजी करू नको !

अरे मुनीमजी लिंबा म्हाताऱ्याला जे जे पाहिजे ते खात्यावर दे !"

हे ऐकून लिंबा म्हातारा मुनीमकडे गेला आणि खत, बी -बियाणे घेऊन बैल गाडीत टाकून आपल्या गावच्या दिशेने रवाना झाला.

जमिनीला पाहिजे तेवढा पाऊस झाला. धरणीचे पोट भरून पाणी नदी ओढ्यातून वाहायला लागले. रात्रभर लिंबा म्हाताऱ्याला झोप लागत नव्हती. उदया पेरणीचा दिवस होता. सर्व तैयारी झाली होती. पेरणी म्हणजे शेतकऱ्यांसाठी दिवाळी पेक्षा मोठा सण कारण त्यांचे खरे दैवत म्हणजे काळी आई. उद्या पेरणी. उद्या पासून एक एक मिनीट अती महत्वाचा. याची लिंबा म्हाताऱ्याला जाण होती कारण एकदा पाऊस लागून बसला की पेरणी करू देणार नाही.

त्यामुळे त्यांनी ठरवले की अगोदर काळ्या जमीनीची पेरणी करायची नंतर बरड (खडकाळ जमीनीची ) पेरणी करायची. पूर्वेकडे तांबट फुटत होते. सर्व बायका सकाळीच उठून अंगण साफ करीत होत्या. कुणी पाणी भरीत होते. कुणी अंगण झाडीत होते. कुणी धूनी भांडी करीत होते. तर कुणी घर पोतरीत होते. पिंपळाच्या झाडावर पक्षांची किलबिल चालू झाली होती. म्हातारीही पेरणीची तयारी करण्यासाठी लवकरच उठली. बायकांची व पक्षांची किलबिल ऐकून, लिंबा म्हाताराही बाजेवरून उठला, खोकलत खोकलत खिडकी जवळ जाऊन चिलम अन् बटवा काढला. चिलमीत तंबाकू भरला वर कापूस लावला व आगकाडी लावून चिलम पेटवली. पेटलेल्या चिलमीचा सूरका ओढून जसा जसा म्हातारा बाहेर सोडत होता, तसा तसा बाहेर आगगाडीच्या इंजिनासारखा चिलमेतून बाहेर धूर येत होता. चार पाच सूरखे ओढल्यावर त्या चिलमीतला जळलेला तंबाकू हातावर मळून दात घासत घासत माळ्यावर गेला. गेल्या वर्षीची माळ्यावर असलेली तिफण काढली. तिला खांद्यावर घेऊन अंगणात ठेवली. घरातले शेवटुन आणलेले लोखंडी फण तिला बसवले. पुन्हा वर जाऊन रासनीचा वखर काढला. त्याला लांब लोखंडी पास बसवली. तिफनीची दांडी, चाडी, मोघे, जूपन सर्व तपासून बघितले व सर्व न विसरता एक एक बैलगाडीत टाकले. वखर व तिफनीची तडजोड करे पर्यंत, म्हातारीने त्याला बाहेरच चहा आणून दिला. म्हातारा चहा पीत पीत म्हातारीला म्हणाला

“झाली का गं तयारी तुझी ?”

“लोकांची आवतं निघाली बग !

आणि अजून आपली बांधाबुंध चालू आहे !”

“अन् त्या रोजदारीनला सांगितले ना आज आपली पेरणी आहे म्हणून ? नाही तर ती दुसऱ्याच्या रोजाने जाईल. अन् ऐनवेळी आपली पंचाईत होईल !

त्यावर म्हातारी बोलली,

"व्हय मी संबदी तयारी केली !

पुरण पोळी बनवली. काळ्या आईला नैवेद्य बनविला.

सोयाबीन, तूर, ज्वारी, खत सर्व बाहेर काढले !

तुम्हीच आता लवकर तयारीला लागा !" हे एकूण लिंबा म्हातारा घाई गडबडीत सर्व सामान बैलगाडी मधे टाकतो व त्याच्यावर पावसाच्या बचावासाठी गोणा अंथरतो. दिवसभर बैलाला तिफनीला जुंपून ठेवायचे म्हणून त्यांना भरपूर खुराक व पाणी पाजतो. घरात जाऊन गाठोड्यातल्या घागरमाळा काढतो त्या बैलाला बांधतो. सर्व बांधाबुंध झाल्यावर, रोजदारीनला घेवून तिघेही गाडीतून शेताच्या दिशेने रवाना होतात.

सकाळचे सात वाजले होते, सर्वच गावकरी पेरणीसाठी शेताच्या दिशेने निघाले होते. आज पेरणीचा पहिला दिवस होता. म्हणून, सर्वांनीच बैल सजवले होते. त्यांना घागरमाळा बांधल्या होत्या, त्यामुळे गावातून शेताकडे जाणारा रस्ता त्या घुंगरांच्या आवाजाने संगीतमय झाला होता. अशा संगीतमय वातावरणात लिंबा म्हातारा आनंदाने आपले बैल शेताच्या दिशेने हाकीत होता. वीस तीस मिनिटात ते शेतात पोहचतात. शेतात गेल्यावर तिघेही खाली उतरतात व पुढच्या तयारीला लागतात. लिंबा म्हातारा अगोदर बैलाला खांदचे काढून त्यांना जुवाला बांधून त्याला थोडा चारा टाकतो व गाडीतील तिफन काढून तिला चाडे -मोघे लावून तिफन जुंपन्याची तयारी करतो. दुसरीकडे म्हातारी ज्या ठिकाणांवरुन पेरणीची सुरवात करायची तिथे तिथल्याच ओल्या मातीच्या चिखलाचे तीन गोळे करून त्याला उभे करून त्यावर हळद कुंकू लावते. त्यांच्या समोर अगरबत्ती लावून नैवेद्य ठेवते. तोवर इकडे म्हाताऱ्याची तिफन पेरणीसाठी तयार असते. नंतर म्हातारी बैलांना हळद कुंकू लावते. त्यांचे पाण्याने पाय धूते. व त्यांनाही पुरणपोळीचा नैवेद्य देते. नंतर तिफनीची पूजा करते. सर्व आटोपल्यावर म्हातारी व रोजदारीन आपल्या कंबरेला कपड्याची ओटी बांधतात त्यात म्हातारी "बी" घेते व रोजदारीन "खत" घेते. सर्व झाल्यावर म्हातारा तिफनीला बैल खांदी घालतो व पहिले तास काढण्या अगोदर दोघेही काळ्या आईच्या चरणी नतमस्तक होतात. व तिला बोलतात,

"हे काळे आई यंदा तुझ्या पोटात हिरव्या सोन्याची खाण येऊ दे!"

असे बोलून म्हातारा बैलाला प्रेमाने आवाज देतो. बैल पुढे पुढे सरकतात. व पेरणीला सुरवात होते.

लिंबा म्हाताऱ्याची पेरणी, सतत सहा सात दिवस चालते. या सहा सात दिवसात त्याने काळ्या आईच्या पोटात दहा पोते खत, तिन पोते सोयाबीन, दोन थैल्या मूंग, दोन थैल्या ज्वारी ;एक थैली उडद, वीस किलो तूर, घालून एकदाचा मोकळा होतो.

आईच्या पोटात पहिल्या महिन्यापासून ते नवव्या महिन्यातपर्यंत गर्भाचा सतत बदल होत जातो. एका रक्ताच्या गोळ्याचे हळूहळू जिवात रुपांतर होते. त्या जिवाचे सर्वच अवयव हळूहळू त्या पोटात निर्माण होतात. तसेच शेतकऱ्यांने काळ्या आईच्या पोटात जी बीयांची पेरणी केलेली. असते त्यातही तासातासाने बदल होत जाते. प्रथम बी फूगायला लागते त्यामुळे बियाच्या वरचे आवरण नष्ट होते. हळूहळू आत दडलेला ईवलासा अंकुर त्या बियामधून बाहेर येण्याचा प्रयत्न करतो. दोन तीन दिवसात तो आपले दोन्ही हात जोडीत काळ्या आईच्या पोटातून बाहेर येतो. नवजात लेकरा सारखा. सर्वच शेतकऱ्याची पेरणी आनंदात झाली होती. पेरणीच्या दिवसात इंद्राने त्यांना अजिबात परेशान केले नाही. त्यामुळे कुणालाही त्रास न होता आनंदात पेरणी झाली. पिकं हळूहळू वर येत होती. मंजूळ वाहणाऱ्या वाऱ्यासोबत तेही आनंदाने नाचत होती. बैलांना कोवळा नवीन हिरवागार चारा येत होता.

पण सात आठ महिने तहानेने व्याकूळ झालेली जमिन एका पावसाने तृप्त झाली नव्हती. पहिला पाऊस जमिनीच्या पोटात जायायला जास्त दिवस लागले नाही. त्यामुळे पुन्हा जमीन कोरडी झाली. हळूहळू जमिनीचा ओलावा नष्ट होत चालला होता. नदी ओढ्यातले वाहणारे पाणी हळूहळू कमी होत चालले होते. म्हणून पुन्हा सर्वांना पावसाची आस लागली होती. सर्व आकाशाच्या दिशेने बघत होते. नूकतेच वर आलेले कोवळे पिक कमकूवत होत चालले होते. लिंबा म्हाताराही खूप चिंतेत होता आता जर नऊ दहा दिवसात पाऊस पडला नाही तर, दुबार पेरणीचे संकट उभे राहील. हीच पेरणी कशी बशी झाली आता पुन्हा पेरणी कशी करायची ? याच पेरणीसाठी खत बियाणे उधार आणले. आता पेरल्यानंतर पावसाने घात केला तर काय करायचे ?पुन्हा आपल्याला खत बियाणे घेण्यासाठी कोण पैसे देणार ?

रोज लिंबा म्हातारा आणि म्हातारी शेतात जाऊन त्या सुकलेल्या पिकाकडे बघून तेही मनातून खचून जायचे. शेवटी वरूण राज्याने त्यांचावर कृपादृष्टी केली. दुपारची वेळ होती आकाशात जागोजागी पांढरे ढग दिसत होते. पण, त्या ढगाकडे कुणाचेही लक्ष नव्हते

कारण रोजच तसे पांढरे ढग येत होते व वाऱ्यासोबत नाहीसे होत होते. पण, आज पांढऱ्या ढगात परिवर्तन होत होते. हळूहळू पांढऱ्या ढगाचे रुपांतर काळ्या ढगात होत होते. सुसाट वाहणारे वारे हळूहळू मंदावत होते. सूर्य कधीच ढगाआड दडला होता. आता मात्र सर्वांचे लक्ष वर गेले होते. व मनोमन सर्वच प्रार्थना करीत होते, “देवा ! एकदाचा पडू दे रे !आम्हांला दुबारा पेरणी करू देऊ नकोस. ”

लिंबा म्हाताराही डोळ्यावरचा चष्मा काढून, उजवा हात डोक्यावर ठेऊन  ढगांचा व पावसाचा अंदाज घेत होता, अचानक बदलेल्या  वातावरणामुळे पाऊस येणारच हे नक्की झाले होते. सर्वत्र काळोख पसरत होता. रानात चरणाऱ्या गायींनी गोठ्यातल्या त्यांच्या चिमुकल्या वासरासाठी  हंबरडा फोडायला सुरवात केली व गावाच्या दिशेने धाव घेतली. पक्षांची चिवचिवाट सुरू झाली. आकाशात जोरजोरात मेघ गर्जना होत होती. वीज चमकत होती. असे आक्राळ विक्राळ आकाशाचे रूप बघून साऱ्याने घराकडे धाव घेतली. ढोरेही घराच्या दिशेने पळत सुटले. लिंबा म्हातारा व म्हातारीही आपले बैले घेऊन गावच्या दिशेने पळत सुटले. पण पावसाने मधेच साऱ्यांना घेरले. व विजेच्या कडाक्या सोबत मुसळधार पावसाचे आगमन झाले. आभाळ झाकून आल्यामुळे पाऊस आता लवकर थांबणार नाही, हे निश्चित होते. आणि पाऊस थांबण्याची वाट बघितली आणि ओढ्याला पूर आला तर, रात्रभर अडकून रहावे  लागेल. म्हणून, त्या तूफान पावसात ही सारे शेतकरी घराकडे रवाना झाले. निराश झालेल्या लिंबा म्हाताऱ्याच्या मनात पुन्हा आशेचा अंकूर फुटला. ऐनवेळी का होईना पण पाऊस पडला आणि वाळत चाललेल्या पिकांना पुन्हा त्याने जिवदान  दिले. पावसाने या वेळेस घात नाही केला. आणि मला दुबार पेरणीपासून  वाचवले. घराकडे जातांना मुसळधार पावसाचे सटकारे बसूनही लिंबा म्हाताऱ्याला त्याचे काहीच वाटत नव्हते. कारण पावसाची खरी गरज असल्यामुळे त्या वेदना आनंदाने झेलत सारेच शेतकरी घराकडे जात होती.

पाऊस सतत पाच सहा दिवस कमी जास्त प्रमाणात चालूच होता. पाच दिवस ओढ्याला सतत पूर आल्यामुळे सारे शेतकरी घरीच होते. सहाव्या दिवशी मात्र पावसाने आपला जोर कमी केला. हळूहळू पाऊस थांबला. सहा दिवस गायब झालेल्या सुर्याने, आज सर्वांना दर्शन दिले. दुपारचे तीन वाजले होते. नद्या, नाले विहरी  सारेच पाण्याने तुडूंब  भरले होते.

सगळीकडे बेडकं ओरडत होती. नदीचा पूर ओसरलेला बघून लिंबा म्हातारा घरातून उठला. कणग्याला अडकवून ठेवलेली छत्री काढली. व सरळ शेताच्या दिशेने

निघाला. सतत पाच दिवस लागोपाठ पडणाऱ्या पावसाने काहीतरी पिकांचा घात केला असेल हे नक्की होते. लिंबा म्हाताऱ्याला बघून सारे शेतकरी आपापली शेती बघायला, शेताच्या दिशेने निघाले. घाई घाईत लिंबा म्हाताऱ्याने शेताची पाहणी केली. मुसळधार पावसाचा तडाखा पिकाला बसला होता. चढावर असलेली जमीन पिकासकट वाहून गेली होती. स्थिर असलेली जमिनीवर कुठे कुठे पिकांच्या वरपर्यंत पाणी साचले होते. त्या पाण्याखालचे पिक सडून नक्कीच जाणार.

पण काय कराव हे कुणाच्या हातात ? लिंबा म्हाताऱ्याचीच नाही तर साऱ्याच शेतकऱ्यांचे त्या पावसाने नुकसान झाले होते. पण सर्वांच्या तोंडी एकच बोल होता.

निसर्गाचा कोप आहे. कुणाच्या हातात काही नाही. जे आहे त्यातच समाधान मानलेले बरे !

श्रावण महीना जवळ येत होता. जिकडे नजर जाईल तिकडे हिरवाई दिसत होती. गवतही मोठमोठी झाली होती. त्या हिरव्या गवताचे लचके बैल आनंदात तोडत होते. सोनकीड़े, भुंगे, फुलपाखरे आनंदात इकडे तिकडे बागडत होती. नाचत होती. लिंबा म्हाताऱ्याचे शेतही हिरवेगार लसलसीत दिसत होते. लिंबा म्हातारा अन् म्हातारी पिकांच्या सेवेसाठी सकाळ ते संध्याकाळ मेहनत करीत होती. निंदण, खुरपण, डवरण सतत चालूच होते. सर्व काही ठीक चालले होते. पण जेंव्हा लिंबा म्हाताऱ्याने एका एका झाडाचे निरक्षण केले, तेंव्हा त्याला कळले की सोयाबीनच्या झाडावर आळ्यांचा आणि किड्यांचा सुळसुळाट झाला आहे. त्या आळ्या आणि किड़े हळूहळू पिकांना कुडतडत होती. त्या झाडांना नष्ट करीत होती. आता मात्र किटकनाशक फवारणी आणि युरिया खताची अत्यावश्यकता होती. पुन्हा लिंबा म्हाताऱ्यावर संकट कोसळले. खिशात काहीही नव्हते आणि पुन्हा आठ नऊ हजारांची आवश्यकता भासत होती. दुसऱ्याकडे हात पसरविण्या पेक्षा त्याला त्याची मुंबईतली दोन मुले आठवली. लगेच गावात जाऊन पि. सी. ओ. वरून त्यांना फोन केला. तब्येतीची विचारपूस झाली इकडची तिकडची विचार पूस झाली. नंतर लिंबा म्हातारा मुद्यावर आला . आणि आठ नऊ हजारांची त्याची अडचण तो मुलांना सांगू लागला. लिंबा म्हाताऱ्याचे बोलणे ऐकून मुलांनी आपल्या अडचणी पुढे केल्या. मुलांचा शिक्षणाचा खर्च, त्यांचे डोनेशन , त्यांची

फी, कपड़े, रूमचे भाडे, राशन पाणी, रोजचा खर्च, यालाच पगार पुरत नाही. या वर्षी भागवा पुढच्यावर्षी नक्की तुम्हांला मदत करतो. सरकार सारखे खोटे आश्वासन देऊन मुलानी फोन ठेवला. पण लिंबा म्हाताऱ्याला माहीत होते की, युरिया खताचा सिडकावा आणि किटकनाशक फवारल्या शिवाय यंदाचे पीक आपल्या हातात येणार नाही. थोड्याशा चुकीमुळे तोंडचा घास जाईल.

संध्याकाळ होत होती. हळूहळू उजेडाचे अस्तित्व संपून अंधार जमिनीवर कब्जा करीत होता. उकिरड्यावर दाने टिपणाऱ्या कोंबड्या डाल्याच्या आत जाऊन शांतपणे बसल्या होत्या. म्हातारी अंगणातील लाईट लावून बाहेरच बसली होती. लिंबा म्हातारा कुणी उसने पैसे देतो का ते विचारायला गावात फिरत होता. पण व्याजाची चटक लागलेली गावातील सावकार मंडळी उसने पैसे कसे देतील. त्यामुळे नाराज होऊन म्हातारा घरी परतला. व हात पाय न धूता बाहेरच जोत्यावर जाळ्याला अंग टेकून चिलम फुकीत बसला होता. पैशाचे काम झाले नाही, हे म्हातारीने अचूक ओळखले. आता शेवटचा उपाय होता. जो म्हातारीच्या हातात होता. लिंबा म्हातारा चिंतेत दिसल्यामुळे म्हातारी लगेच घरात गेली. चूल पेटलेलीच होती, तिच्यावर टोप ठेवला त्यात पाणी, साखर, चायपत्ती टाकून कडक कडक काळा चहा बनवून म्हाताऱ्याला दिला. म्हाताऱ्याने चिलमचा सूरका बाजूला ठेऊन चहाचा सूरका चालु केला.

थोड्या वेळाने म्हातारीने त्याला हळूच विचारले,

“काय म्हणते सावकार ? देते का उसने पैसे सोयाबीन निघेपर्यंत ?”

म्हातारा चाय पीत पीतच बोलला,

“नाही बा !”

“समद्याला विचारून बघितलं, कुणी बी उसने पैसे द्यायला तयार नाही !”

बोलता बोलता म्हातारीने हातातल्या व पायातल्या चांदीच्या पाटल्या व काकण काढल्या व म्हाताऱ्याच्या हातात दिल्या. व म्हणाली उद्या गोरेगावच्या सोनाराकडे जा. ह्या पाटल्या, , काकण विका आणि या खत आणि किटकनाशक घेवून.

तेवढ्यात लिंबा म्हातारा पुटपुटला,

“नको नको !”

“अग एक एक रूपया जमवून तुला ही चांदीची भांडी केली “

ते तू विकायला सांगतेस ? माझ मी बघीन. तू तुझी भांडी ठेव तुझ्याकडे. मला नाही पटत हे !

तेंव्हा शांतपणे म्हातारी त्याला बोलली,

“अहो तुंम्ही कुणाकडून तरी पैसे घेणारच आहात. त्यांना सोयाबीनवर द्यायचेच आहेत. हे पण तसेच करा, आता विका नंतर शेतातील माल विकल्यावर तुमच्या हाताने पुन्हा करा. ”

“तुंम्ही जर हे भांडी विकून आताची गरज भागवली तर निदान तुम्हांला दुसऱ्याकडे हात पसरवण्याची गरज नाही पडणार. ”

म्हातारीचे बोलणे म्हाताऱ्याला पटले. दुसरा इलाजही नव्हता, काही केले तरी पैसे हवेच होते. त्यामुळे म्हाताऱ्याने ही तिच्या बोलण्याला होकार दिला. आणि एक मोकळा श्वास टाकला.

एक चिंता संपली. आता पैसे मागण्यासाठी कुणाकडे हात पसरवण्याची गरज पडणार नाही.

रात्र होत होती. दोघेही जेवेण करून आता झोपायच्या तयारीला लागले. साठ vat चा गोळा जळत होता. म्हातारीने बाज टाकली गोधडे टाकली. आणि दोघेही आपआपल्या बाजेवर झोपले. लिंबा म्हाताऱ्याचे डोळे बंद होते. पण म्हातारा जागाच होता. त्याला झोप लागत नव्हती, त्याच्या डोळ्यासमोर शेतातील पिकच दिसत होती. जो पर्यंत फवारणी होणार नाही, तोपर्यंत त्याला चैन पडणार नाही.

पूर्वेकडे तांबड फूटत होते कावळ्याचे कावकाव नुकतेच चालू झाले  होते. लिंबा म्हातारा बाजेवरून उठला जमीन चाफलत चाफलत चष्मा हुडकला आणि डोळ्यावर लावला. कमरेवर एक हात ठेऊन दरवाजा उघडला. बाहेर नेमकच उजाडत होते. त्यामुळे जोत्यावर बसला. चिलम काढून सूरके ओढ़ण्यात मग्न झाला. झाडावर पक्षांची किलबिलाट सुरू झाली . गोठ्यातले बैल उभे राहून आपल्या  जिभेने  आपली पाठ चाटत होते. त्यामुळे त्यांच्या टाळाचा नांद कानी पडत  होता.

लिंबा म्हाताऱ्याने आज सारे काम लवकर उरकून गौरेगावला औषध व खत आणण्यासाठी तयारी करत होता. कारण त्याला आजच औषध आणून फवारनी करायची होती. त्यामुळे तो पहिल्याच नंबरच्या गौरेगावला जाणाऱ्या  ऑटोरिक्षा मधे बसला. त्याच्या शेजारी गावातला विष्णु आज्या ही बसला. तोही औषध आणण्यासाठी गौरेगावला जात होता. विष्णु आज्याची हालतही लिंबा म्हाताऱ्या सारखीच होती. विष्णु आज्याला दोन मुले होती  पण ती दोन्हीही मुंबईलाच त्यामुळे हा ही लिंबा म्हाताऱ्या सारखा एकटाच पडला होता. जवानपणाची वेगळी गोष्ट होती. पण, म्हातारपणीं दोन्हीकडेही लक्ष द्यावे लागते. शेतीकडे पण आणि शरीराकडे पण. रिक्षाची भरती झाल्यावर रिक्षावाल्यांनी खाली पडलेला दांडा उचलला आणि गौरेगावच्या दिशेने रवाना झाला.

“कुठं ??”

औषध आणायला जातोस का लिंबा ?

विष्णु आज्या बोलला

“हो तात्या !”

“सोयाबीनवर आळ्या खूप पडल्या,. म्हणलं औषध आणून फवारणी करावी. ”

लिंबा म्हातारा हसत हसत बोलला.

त्यावर विष्णु आज्या बोलला,

“काय आपलं नशीब लिंबा !”

“आयुष्यभर शेतात कष्ट केले वाटलं म्हातारपणीं नातवंडा सोबत घरी बसून खेळावं, सूनेच्या हातच खावं, पण आपल्या नशिबात कष्टा शिवाय दुसर काहीही नाही, पोरं आपआपल्या परीने शहरात गेली. आणि तिकडेच स्थायिक झाली. सण वाराला कधी मधी येतात. एक दोन दिवस राहतात. अन् निघून जातात. आपल्याला बापजाद्याच्या जमीन अन् हे गाव सोडू वाटत नाही !

हे ऐकून लिंबाचाही चेहरा थोडा उतरला, व त्याला म्हणाला,

“काय करावं तात्या ?”

“पोरांना आपल्याला सोडून थोडं राहू वाटत असेल? पण त्यांच्याही पोटा पाण्याचा प्रश्न आहे. आपण अर्ध्या पोटी कधी उपाशी राहून संसार चालवला. पण, आताच्या पिढीला ते जमत नाही !

त्यांना सुख चैन आणि त्यांच्या मुलांना इंग्लिश मिडियमचं शिक्षण हवं आहे. ते या खेड्यात अन् सहा एकर कोरडवाहू जमिनीवर कसे शक्य आहे ? या सहा एकर जमिनीवर त्यांचा अन् त्यांच्या बायकांचा सुख चैन कसा भागेल ?मी त्यांना वारंवार म्हणतो दोघामधून एकजणांनी या अन् शेती सांभाळा ! पण तेच मला उलट बोलतात, शेती विका अन् तुंम्हीच दोघे मुंबईला या !तुम्हीच सांगा तात्या? ह्या आपल्या काळ्या आईला आपण तळ हाताच्या फोडावानी आजवर जपत आलो. तिला अन् या गावाला सोडून परदेशी कसं जायचं ?त्या परीस मेलेलं बरं !”

ऑटोरिक्षा गोरेगावला आला. तसे दोघेही उतरले. आणि आपआपल्या दिशेने निघाले. लिंबा म्हातारा सोनाराच्या दुकानात गेला. व म्हातारीने दिलेल्या त्या चांदीच्या पाटल्या व काकण सोनाराला विकल्या. व पैसे घेऊन औषधाच्या दुकानात जाऊन युरिया खत आणि किटकनाशक औषध घेऊन गावाकडे परत रवाना झाला.

दहा वाजले होते, वारा शांत होता. हिरवीगार रानातील पिक आणि मोठ मोठी झाडे स्तब्ध उभी होती. बंद हवा आणि आग ओकणारा सूर्य हळूहळू माथ्यावर येत होता. त्यामुळे शरीरातून घाम वाहत होता. लिंबा म्हातारा बैलगाडीतून फवारणी पंप आणि खताची पोती घेऊन घाईघाईत शेताच्या दिशेने निघाला होता. त्याला संध्याकाळ होईपर्यंत साऱ्या पिकावर

किटकनाशक फवारणी करायची होती. म्हणून लिंबा म्हातारा लगबगीने शेतावर गेला, शेतात म्हातारी त्याची वाट बघतच होती. आल्या आल्या लिंबा म्हातारा कामाच्या तयारीला लागला हे बघून म्हातारी बोलली,

"अहो !

अगोदर दोन घास खा तरी, सकाळपासून फक्त चहावरच आहात !"

त्यावर लिंबा म्हातारा बोलला,

"नको !"

मला आता काहीही नको, जोपर्यंत सारा सिवार फवरणार नाही तोपर्यंत एक घासही खाणार नाही. जा तू बी तयारी कर, घे हा हांडा आणि आन पाणी विहिरीतून बिगीबिगी. हे बोलताच म्हातारीने चटकन हांडा उचलला. आणि घाई घाईत विहिरीवरुन पाणी भरून घेऊन आली. म्हाताऱ्याने ते पाणी पंपाच्या आत ओतलं त्यात चार ढक्कन किटकनाशक औषध टाकले टाकी बंद केली. आणि पंप पाठीवर अडकवले. पंप चालू करण्याअगोदर म्हाताऱ्याने एक नजर पिकावर टाकली. उंच उंच वाढलेली अन् फुलांनी गच्च भरलेली ती झाडे जणू काही सोळा वर्षाची पोरच, ऐन ज्वाणीत आली अशी ती भासत होती. म्हाताऱ्याने पंप चालू केला अन् भर्रर आवाजाने फवारणीला सुरवात झाली.

म्हातारी फवारणीसाठी पाणी आणून देत होती. आणि टोपलीत खत घेऊन पिकांवर शिरकाव करीत होती. म्हातारा फवारीत होता. दोघांचीही काम करण्याची कसरत चालूच होती.

संध्याकाळ पर्यंत सहा एकर वावर पालथे घालायचे होते. थांबून चालणार नव्हतं. कारण, पिकं फुलांवर आली होती. त्याला जर किटकांच्या विघ्नाने जर आक्रमण केले तर, फुलं येण्याअगोदरच गळून जातील. आणि होत्याच नव्हतं होईल. सारा सत्यानाश होईल. त्यामुळे लिंबा म्हातारा जीवाची पर्वा न करता फवारणी जोमाने करीत होता. त्याला तहानेचे आणि भूकेचेही भान राहिले नव्हते. म्हातारीही युरिया खत फेकण्यात मग्न होती.

सूर्य मावळतीला जात होता सूर्य फक्त हात दोन हातच जमिनीत जाण्याचा बाकी होता. लिंबा म्हाताऱ्यांनी ही सारं शेतं सूर्य डूबण्याच्या आतच फवारून घेतलं होतं. म्हातारीही पाणी आणून आणून थकली होती. धूऱ्यावर येऊन म्हाताऱ्याने पंप खांद्यावरचा खाली उतरवला . पाण्याने हात स्वच्छ धुतले. आणि घटाघटा पाणी प्याला. दोघांनीही धूऱ्यावरच्या दगडांवर बसून विसावा घेतला. दिवसभर काबाडकष्ट करून दोघेही थकले होते. तरीही जसा आखाड्यातला पहिलवान मार खाऊन जखमी होतो. आणि विजयी झाल्यावर साऱ्या वेदना तो विसरून आनंदी होतो. तशीच, पिकावर फवारल्या नंतर म्हातारा म्हातारी आनंदी झाली होती.. कारण पाऊसही व्यवस्थित होता. फवारणीही व्यवस्थीत झाली होती. एका एका झाडाला फुलांचे गोळकेच लागले होते. यंदा पिक हातून जाणार नाही, असे लिंबा म्हाताऱ्याला वाटत होते. व तो आनंदी होत होता. हळूहळू अंधार होत चालला होता. आपट्याच्या झाडाला बांधलेली बैलेही घराकडे जाण्यासाठी ओढाताण करीत होती. मान हलवून गळ्यातील घंटीच्या आवाजाने मालकाला घरी जाण्याचा इशारा करीत होती. हे बघून म्हातारी उठली आणि म्हाताऱ्याला बोलली,

"चला लवकर घरी !

नाहीतर अंधार होईल, बैलही घाई करतात घरला जाण्याची. "

हे ऐकून लिंबा म्हातारा बोलला, "व्हय व्हय चल लवकर घरी !

घरी जाऊन तुला स्वयंपाकही करायचा !"

असे बोलून लिंबा म्हातारा दगडावरुन उठला. दिवसभराच्या त्या अवघड कामाने लिंबा म्हाताऱ्याचे सारे अंग दुखत होते. त्याला तिथेच पडून रहावेसे वाटत होते. पण, अंधाराचे साम्राज्य वाढतच चालले होते. म्हणून, दोघेही बैलगाडी जुंपून गावाच्या दिशेने रवाना झाले.

सर्व काही ठीक चालले होते. किटकनाशक आणि युरिया खताच्या टॉनिकने पिकेही धष्टपुष्ट झाली होती. हळूहळू फुलांचे रुपांतर आता कोवळ्या वादीत होत होते. फुलातून आता कोवळ्या शेंगा बाहेर येत होत्या, फुले आता शेंगात रूपांतरित होत होत्या. स्त्रियांना जसे गरोदर पणात सर्वच पोषणसत्व  देऊन त्या पोटातल्या बाळाला धष्टपुष्ट बनवण्याचा प्रयत्न केला जातो, अगदी तसेच  पिके फूलांवर असतांना लिंबा म्हाताऱ्याने त्या पिकांची निगा राखली. आता एक दीड महिन्यानंतर सुगीचे दिवस (पिक कापणी )चे दिवस येणार होते सर्वच शेतकरी यंदाच्या पिकाला बघून आनंदी झाले होते. कारण गेली दोन वर्ष पाऊस त्यांना दगा देत होता. कधी दुबार पेरणी  तर, कधी पाण्याच्या अभावी वर आलेली पिक वाळत होती. या दोन वर्षात शेतकरी सतत दुष्काळाला तोंड देत होते. पण यंदा त्यांना तसे चित्र दिसत नव्हते. कारण, सुरवातीपासून ते आतापर्यंत पावसाने त्यांना धोका दिला नव्हता, त्यामुळेच सारे शेतकरी आनंदात होते. आता फक्त एका पावसाची गरज उरली होती.

आणि तो आज ना उद्या येणारच या आशेवर सारे शेतकरी होते. आता शेतीतील मेहनतीची सारे काम संपली होती. आता साऱ्या झाडांना शेंगा धरत होत्या. तीस दिवसांनी त्या शेंगा परिपूर्ण होतील आणि त्याच्या पंधरा दिवसानंतर कापणीला सुरवात होईल. लिंबा म्हातारा अन् म्हातारी रोज शेतात येत होती. आणि काळ्या आईच्या कुशीतली ती हिरवी खाण बघून आनंदून जात होती. लिंबा म्हातारा मनाशी बोलत होता, “एक बैल मोडला तेंव्हा वाटलं शेतीचे कसे होणार पण देवांच्या आशीर्वादाने सर्व काही ठीक झाले. दुसरा बैल पण मिळाला जेंव्हा जेंव्हा जे जे पाहिजे होतं ते ते मला मिळालं आन् यंदा शेतात सोनं बहरून आलं. ”

दिवसामागून दिवस जात होते. पण, पाऊस पडण्याचे काही चिन्ह दिसत नव्हते. कारण आता एका खऱ्या पावसाची पिकांना गरज होती. आणि तो पाऊस पिकाला अत्यावश्यक होता . जर आता पाऊस पडला नाही तर त्या कोवळ्या शेंगाची वाढ होणे मुश्कील होते. पुन्हा शेतकऱ्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या आनंदाने हळूहळू दुखात रुपांतर केले. सारे शेतकरी देवाकडे साकडे घालित होते, “एकदाचा पडू दे “म्हणून, नवस बोलीत होते. शेवटी त्यांच्याकडेही देवाला विनवण्या व्यतिरिक्त दुसरा पर्यायच नव्हता.

कारण त्यांची शेती ही पूर्णतः पावसाच्या पाण्यावरच अवलंबून होती. त्यामुळे देवाला साकडे घालण्या व्यतिरिक्त त्यांच्याकडे दुसरा काहीही पर्याय नव्हता. साऱ्या शेतकऱ्यां प्रमाणे लिंबा म्हाताऱ्याचीही तिच  दशा होती. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बघितलेले स्वप्ने धुळीस मिळणार आणि पुन्हां कर्जाचा डोंगर उभा राहणार. हे पक्के होते.

तीन चार महिन्याची गरोदर स्त्री तिच्या पोटातला जिव नेमकाच उलगडत होता. त्या स्त्रीला पौष्टिक आहार घेण्याची गरज आहे. पण तिचा अचानक पूर्ण आहारच बंद केला तर त्या पोटातल्या जिवाची काय दशा होणार ?निश्चीतच ते बाळ कुपोषित जन्मा येणार. तिच अवस्था लिंबा म्हाताऱ्याच्या, आणि दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतीची झाली होती. यावर्षी ऐन वेळी पावसाने घात केला होता. शेंगा व त्यातील दाणा टपोरा न होता कोवळेपणीच सुकून जात होता. आणि या पावसाच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांचे ७० % नुकसान झाले. ज्या झाडाला ७०-८०- शेंगा येत होत्या. त्या झाडाला पावसाच्या कमतरतेमुळे आणि तळपणाऱ्या उन्हामुळे तीन चार शेंगाच तग धरून वाढत होत्या. बाकीच्या कोवळेपणीच वाळून गेल्या होत्या. आणि या शेवटच्या पावसामुळे लिंबा म्हाताऱ्याचा तोंडचा घास हिरावला. उतरते वय, शेतातील कष्ट, त्यात दुष्काळाची झळ, त्यामुळे लिंबा म्हातारा खुप खचून गेला होता. रोज शेतात आंब्याच्या झाडाखाली येऊन एकांतात एकटाच बसत होता.

त्याला आता बँकची सोसायटी, धोंडुचे उधार घेतलेले पैसे, घनश्याम मारवाड्याकडून, व्याजावर घेतलेली बी बियाणे, बायकोचे विकलेले चांदी, त्याच्या डोळ्यासमोर दिसत होते.

काय करावं नी काय नाही हे त्याला कळतच नव्हते. सध्याचे पिक बघून यात खत पाण्याचा खर्चही भरून निघणार नाही, हे त्याला दिसत होते. पावसाच्या न येण्याने सारा गावच सुन्न झाला होता. सोन्यासारखे पिक हातून जातांना दिसत होते. कोणालाही जेवण गोड लागत नव्हतं. घरातले कुणी मेल्यासारखे, सर्वच शेतकरी दुःखी आणि चिंतेत होते. लिंबा म्हातारा शेतात आंब्याच्या झाडाखाली दुःखी बघून शेजारच्या शेतातला महाजी म्हातारा त्याच्या जवळ आला, तसा लिंबा म्हातारा महाजी म्हाताऱ्याला बोलला.

“कोण ?”

“महाजी काका ?”

“हो !”

“काय करतोस लिंबा ?”

“काय नाय, या या बसा !”

महादा म्हातारा त्याच्या जवळ गेला विठ्ठला पांडुरंगा म्हणून त्याच्या शेजारी मांडी घालून बसला.

“लिंबा, भर चिलम !”

हे महाजी म्हाताऱ्याचे बोल ऐकताच लिंबा म्हाताऱ्याने कमेजाच्या खिशात हात घातला , चिलम अन् बटवा काढला, बटव्याची गाठ सोडून त्यातला तंबाकू चिलमीत भरला. चिलमीच्या टोकाला रोजचं मळकट कापड गुंडाळून चिलम तोंडाला लावून माचीसच्या काडीने चिलम पेटवली, दोन तीन सूरके मारून चिलम महाजी म्हाताऱ्याकडे दिली, दोघेही चिलम ओढतात, चिलम ओढून झाल्यावर महाजी नाराज अवस्थेत लिंबा म्हाताऱ्याला बोलतो,

“काय लिंबा, काय झालं हे !”

“आरं, जर असचं चालू राहीलं तर काय करायच आपण दरवर्षी ?”

त्यावर लिंबा म्हातारा बोलला,

“होय काका काय करावं !

आपल्या हातात मेहनत करायच आहे फळ द्यायचं त्याच्या हातात आहे.

मेहनत करण्यात आपण काहिही कसर नाही ठेवली,

बारा महीनेही राब राब राबलो. पण, शेवटी नशीबच आपलं फूटकं. त्याला आपणतरी काय करणार ? आता या वर्षी काय करावं काही समजयंना. ?”

त्यावर महाजी बोलला,

“दोन वर्ष झाले शामराव सावकाराचे व्याजाने पैसे घेतले होते. गेल्या वर्षी शेतातल्या पिकांने धोका दिला. वाटलं यावर्षी तरी त्याचे सर्व पैसे फेडावे. पण, या वर्षीही पावसाची तिच बोंब !”

बोलता बोलता महाजी म्हाताऱ्याचा कंठ दाटून आला. दोघांच्याही मनात एकच दुःखाचे वावटळ गोंगावत होते. महाजी म्हाताऱ्याने बोलणे तेथेच संपून, हातात काठी

घेऊन  आपल्या शेताच्या दिशेने जाऊ लागला. लिंबा म्हातारा त्याला एकटक  नजरेने बघतच होता. लिंबा म्हाताऱ्याला त्याचा देह दिसत नव्हता. तर, त्यात दडलेले ते अथांग दुःख दिसत होते. त्या हिरव्या रानात सगळीकडे अशांतता पसरली होती. महादा आणि लिंबा म्हाताऱ्या सारखे तेही दुःखीच वाटत होते. मोठमोठी झाडे स्तब्ध उभी होती. त्याचे पानही हलत नव्हते, जणू काही त्यांच्या दुखात तेही सहभागी झाले. त्यांच्या कर्जाचा भार झेलत.

हंगामाचे दिवस आले. शेतातील पेरलेली पिके आता काढणीला आली होती. पिकांची पाने सर्व वाळून गळून गेली होती. आता फक्त त्या पिकांचे सांगाडेच दिसत होते. आणि त्या सांगाड्याला तीन चार शेंगा लटकलेल्या दिसत होत्या. आता सर्व शेतकरी पिक कापणीत मग्न झाली होती. काळ्या आईनी जेवढे पदरात पाडले होते, तेवढे शेतकरी घरात नेण्याची घाई करीत होते. कारण जशी पेरण्याची घाई तशीच कापून सुडी घालण्याची घाई करावी लागते. जर कापणीच्या वेळेस पाऊस आला तर, जे आहे तेही पदरात पडणार नाही. म्हणून लिंबा म्हातारा आणि म्हातारी सकाळीच विळा घेऊन शेतावर कापणी करीत होते. कोपलेला निसर्ग, तहान न भागलेली जमीन, पाण्याच्या अभावी करपलेली पिके, आग ओकणारा सूर्य अशा बिकट अवस्थेत पिकांची कापणी सुरू झाली. रोज कापणी करायची आणि संध्याकाळी सुडी घालायची. लिंबा म्हाताऱ्याने आणि म्हातारीने पाच सहा दिवसात सर्व शेतातील पिकांची कापणी करून सुडी घालून तयार ठेवली. आता त्या सुडीतील शेंगातील दाणे मळणयंत्रातून बाहेर येण्यास आतुर झाले होते.

जशी पूर्वेकडे तांबट फूटायला सुरवात झाली तशी लिंबा म्हाताऱ्याची घाई झाली,. कारण , आज शेतात मळणयंत्र येणार होतं. त्यामुळे पोतं, चवाळं, गोणा, टोपली, म्हातारा बैल गाडीत टाकीत होता. दिवस उगवायच्या आत त्यांनी आवराआवर केली. आणि दोघेही बैलगाडीत बसून शेताच्या दिशेने निघाले. शेतावर पोहचल्यावर त्यांनी सुडीच्या वर अंथरलेले गवताच्या पेंढ्या बाजूला काढल्या. आणि सोबत आणलेली चवाळे जमिनीवर अंथरली, पूर्वेकडे मोठा लालबुंद दिसणारा गोळा आता तेजमय होऊन पुढे पुढे जात होता.

थोड्या वेळात लिंबा म्हाताऱ्याच्या शेतात मळणयंत्र आले तसे दोघेही कामाची घाई करतात. मळणयंत्र सुडीच्या शेजारी उभे होते, त्याच्या आजुबाजुला दाणे वाया जाऊ नये म्हणून म्हातारा चवाळे अंथरतो. मळणयंत्र चालू करण्यापूर्वी त्याला म्हातारीने अगरबत्ती लावून प्रसाद म्हणून साखर ठेवली आणि जास्तीत जास्त धान्य पदरात पडू दे म्हणून काळ्या आईला साकडे घातले. आणि, मळणयंत्राच्या मालकाला मळणयंत्र चालू करायला सांगितले.

क्षणातच भर्र भर्र आवाज करीत मळणयंत्र चालू झाले. कवेत मावेल तेवढे काडं रोजदार त्या मळणयंत्रात टाकीत होते. मळणयंत्राच्या आत त्या लोखंडी गोलाकार खिळ्याच्या चाकाने क्षणात त्या काडाचे भूश्यात रुपांतर होत होते आणि पंख्याच्या साह्याने भूसा बाहेर फेकला जात होता. आणि, त्यातील दाणे चाळणीतून चाळून एका निमुळत्या तोटीतून बाहेर पडत होते. त्या निमुळत्या तोटीच्या शेवटी लिंबा म्हातारा आणि म्हातारी टोपलीने दाणे भरून पोत्यात जमा करीत होते, मळणयंत्राने पाच सहा तासातच त्या सहा एकर शेतातील धान्यांतील काडं गिळून फस्त केले आणि त्या वाळलेल्या पिकांचे बाकी अवयव बाहेर फेकून फक्त धान्यच लिंबा म्हाताऱ्याच्या हवाली केले.

मळणयंत्र बंद झाल्यावर लिंबा म्हाताऱ्यांने पोत्यात जमा केलेल्या धान्यांवर नजर फिरवली आणि त्याला धक्काच बसला ज्या शेतात त्याला दरवर्षी तीस ते पस्तीस पोते धान्य व्हायचे , त्या शेतात यावर्षी फक्त चार पोतेच धान्य झाले,. हे धान्य नेऊन बाजारात विकले तर जो पेरणीला खर्च झाला तेवढाही निघणार नव्हता. पण याला दुसरा इलाजही नव्हता, निसर्गाने जेवढे पदरात पाडले त्याला हसत हसत स्विकार करण्याची आता शेतकऱ्यांना सवय झाली होती. कारण या वर्षी सर्व शेतकऱ्यांच्या पदरात निसर्गाने निराशाच टाकली होती. "जे जगाला ते आपल्याला" ही जुनी म्हण आठवून लिंबा म्हातारा जे भेटले त्यात समाधान मानून ते धान्य बैलगाडीत टाकून गावाकडे रवाना झाला.

या वर्षी पाऊस पडला नव्हता म्हणून, ऑक्टोबर महिन्यातच सारे शेत उनगले होते. शेतातील तूर उभ्या उभ्याच वाळून गेली होती. पावसाने खरीब पिकांचीच वाट लावली होती. म्हणून रब्बी पिक गहू, हरभरा, करडी, सुर्यफूल ही पिके शेतात पेरण्याचा प्रश्नच नव्हता, पाणी नसल्यामुळे हे सारे अशक्यच होते. वाहटोळी सारखे दुष्काळ लिंबा म्हाताऱ्याच्या आणि शेतकऱ्यांच्या भोवती गोंगावत होतं. दिवाळी सात आठ दिवसावर येऊन ठेपली होती. वर्षभर भेटीला न येणाऱ्या लिंबा म्हाताऱ्याच्या चारीही मुली दिवाळी सणाला भेटीला येणार होत्या, दोन दिवस आई वडिलांच्या सानिध्यात घालवण्याचा आणि जुन्या आठवणी ताज्या करण्याचा, चार दिवस माहेरी आनंदात राहण्याचा हाच तो एक सण. त्यामुळे तीन दिवस अगोदरच चारीही मुली माहेरी आल्या. पण, मुम्बईला राहणार्या दोन्हीही मुलांना याही वर्षी गावी येऊन दिवाळी साजरी करायला वेळच मिळाला नाही. त्यामुळे दोघांनीही आपल्या कुटुंबासोबत मुम्बईलाच दिवाळी करण्याचे ठरवले. त्यामुळे लिंबा म्हाताऱ्याला इकडे आड तिकडे विहीर अशी, दुतोंडी समस्या उभी ठाकली, जर दोघापैकी एकही मुलगा गावी आला असता तर, त्याचा मुलींच्या साडीचा तरी खर्च वाचला असता. जेमतेम बारा पंधरा

हजाराचा माल लिंबा म्हाताऱ्याला झाला होता. त्याने अर्ध्या पैशात थोडे थोडे कर्ज चुकवून अर्ध पैसे वर्षभराच्या सुख दुःखासाठी उराशी बाळगून ठेवायचे ठरवले होते. पण या दिवाळीत पाच सहा हजारात गाडल्या जाणार हे नक्की होते. पण आयुष्यात स्वतः उपाशी राहून लेकीबाळीला सुखात ठेवणाऱ्या लिंबा म्हाताऱ्याने ठरवले होते की, यंदाची दिवाळीही मुलींसाठी आनंदाचीच करीन, मुलींना नातवंडाना हवे ते लिंबा म्हाताऱ्यांने आणून दिले. दिवाळीचे चार पाच दिवस चारही मुलींनी अगदी आनंदात घालवले. जाण्याच्या अगोदर मुलींना तालुक्याला नेऊन त्यांच्याच हाताने त्यांना हव्या त्या साड्या, नातवंडांना हवे ते कपड़े घेऊन चारही मुलींना त्यांच्या सासरी सोडून आला. एक जुनी म्हण आहे, ”दुष्काळात तेरावा महीना “आणि ही म्हण लिंबा म्हाताऱ्याला यावर्षी तंतोतंत लागू झाली. दिवाळी झाली तीन चार दिवस उलटूनही गेले. पण त्यांनी दिवाळीच्या बोलीवर घेतलेले कर्ज काही लिंबा म्हाताऱ्याला झोप लागू देत नव्हते, घनश्याम मारवाड़ी आणि धोंडुला दिवाळीत देतो म्हणून बोलणी केली. आता दिवाळी संपली आता काहीही केले तरी त्यांचे पैसे त्यांना द्यावेच लागणार. नेमक्या दिवाळीतच लिंबा म्हाताऱ्याचे दिवाळ निघाल्या सारखे झाले होते. सर्वत्र काळोखी शांतता पसरली होती. रात्रीचे बारा वाजले होते. दिवसभर धावपळ करून सर्वच आपआपल्या घरात साखर झोपेत होते. गोठाही शांत होता. त्या किर्र अंधारात अधून मधून एखाद्या कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज येत होता. सगळीकडे भयान शांतता पसरली होती. पण या भयान रात्री लिंबा म्हातारा अजूनही जागीच होता. या शांत रात्रीही त्याच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले होते. समोर येणारे हे एक वर्ष कसे काढायचे ?आणि दिवाळीच्या बोलणीवर घेतलेले पैसे कसे फेडायचे ?याचाच विचार त्याला सतवत होता छळत होता. यातून निघायचा मार्ग तो शोधत होता. रात्रभर विचार करून त्याला एकच मार्ग दिसत होता. पण त्या अगोदर त्याला तो मार्ग योग्य आहे की नाही यासाठी त्याच्या बायकोला ही विचारणे गरजेचे होते. लिंबा म्हातारा बाजेवरून उठला बाजेखाली ठेवलेला चष्मा काढला . पाण्याच्या हांड्याजवळ गेला, ग्लासात पाणी घेतले. घटाघटा पाणी प्याला. चिलम पेटवली चिलमीचे तीन चार सूरके ओढले. आणि, तसाच चिलमीत जळत असलेला तंबाकू जमिनीवर टाकून तो पायाने विझवला. पुन्हा बाजेवर जाऊन थोडावेळ बसला. भिंतीला अडकवलेल्या घड़ीवर नजर फिरवली रात्रीचे दोन वाजत होते. पण लिंबा म्हाताऱ्याने ठरवले, आजच ही गोष्ट म्हातारीच्या कानावर घालायची. म्हणून, पुन्हां उठला बायकोच्या बाजेवर जावून बसला आणि हळूच तिला आवाज दिला.

“ये,

ऐकले का ?उठ ! “

“कोण ?

तुम्ही ! काय झालं ?

तब्येत ठीक आहे ना !”

म्हातारी त्याच्या डोक्याला हात लावून विचारत होती.

“नाय नाय !ठीक आहे तब्येत, ठीक आहे !”

लिंबा म्हातारा हसत हसत म्हणाला

“मंग ?”

“काय झाले रात्रीचे दोन वाजले अजून कसे झोपले नाही तुंम्ही ?”

म्हातारी बोलली,

“कशी झोप लागणार ?”

“पेरणीसाठी घेतलेले पैसे दिवाळी झाल्यावर वापस करायचे होते. पण आता खिशात दमडी पण नाही, साऱ्या गावाला ठाऊक आहे, हा लिंबा बुद्ध दिलेला शब्द पाळणारा माणूस हाय. आता काही केलं तरी चालेल अगदी जमिनीचा एखादा तूकड़ा विकायचे काम पडले तरी चालेल. पण, बोलणीवर त्यांचे पैसे त्यांना वापस करायचे म्हंजी करायचे, बस्स !”

जमिनीचा टुकड़ा विकायचे म्हणल्यावर म्हातारीला खडबडून जाग आली अन् त्याला म्हणाली

“आहो काय बोलता हे ध्यानावर आहात की नाही. ! तुमची खानदानी जमीन आहे ती तिला विकायच म्हंजी, भावकित नाक कापेल की आपलं ! त्यापरी त्यांना आपण हात जोडून विनंती करू. आणि एक वर्षाची मुदत आणखी मागू आणि पुढच्या वर्षी सर्वाचे पैसे चूकते करू !”

"अगं हो पण थोडेफार तरी त्यांच्या हातात टेकवावे लागतील की नाही ?यंदाच्या दुष्काळाची झळ फक्त आपल्यालाच  नाही तर साऱ्या मुलखाला आहे. जमीन विकण्या पेक्षा एक दुसरा  बी मार्ग आहे. बघ पटतय का तुला ते !"

"कोणता ?"

म्हातारी आश्चर्याने त्याच्याकडे बघून म्हणाली.

"बैल विकायचा !"

म्हातारा बोलला,

"काय ? अहो पण !"

"नाही, आता तू काही बोलू नको, यातून बाहेर निघण्याचा दुसरा काही मार्गच मला सापडत नाही. हे बैल विकून कर्ज आणि वर्षभराचं तरी आपलं भागेल, अशा दुष्काळात आपणच उपाशी तर बैलाला काय द्यावं !"

"व्हय, दुसरा काय पर्याय ?

बघा, करा तुमच्या विचाराने !"

असे बोलून दोघेही त्या काळोख्या शांत रात्री सारखे शांत झाले. आणि लिंबा म्हाताऱ्याच्या डोक्यातले वादळही  क्षणात शांत झाले.

सकाळचे चार वाजले होते. म्हातारी बाजेवरून उठली तशी गोठ्याकडे गेली. चाबीने गोठ्याचे कुलूप उघडून कवाड उघडले. आपल्या मालकिणीला गोठ्यात आलेले बघून दोन्हीही बैल उठून उभे राहून, आळस देऊन आपल्या जिभेने अन् शिंगाने आपले अंग चाटीत होते व खाजवीत होते.  त्यांना वाटले रोजच्या प्रमाणे म्हातारी त्यांना अंगणात नेऊन बांधणार. पण , त्या मूक्या जीवाला काय माहीत की, आज त्यांचा या गोठ्यात अन् मालक, मालकीणी सोबत शेवटचा दिवस आहे. म्हातारी त्यांच्या जवळ जाऊन दोघांना ही कुर्वाळीत होती. आजवर जिवाभावाचे नाते जडल्यामुळे, त्या बैलाकडे बघून म्हातारीच्या डोळ्यात अश्रू येत होते. त्यांच्या पाठीवर हात फिरवून हुंदके देत बोलत होती.

"माफ करा रे बाबांनो !

आम्ही आमच्या स्वार्थासाठी तुम्हांला विकतोय !"

आज मंगळवार. आज हिंगोलीचा बैल बाजार. त्यामुळे लिंबा म्हाताऱ्याने ठरवले की, आजच बैल बाजारात घेऊन जायायचे. आजचा दिवस गेला तर पुन्हां एक आठवडा थांबावे लागेल. त्यामुळे, दोघांनीही बाजारात जाण्यासाठी तयारी चालू केली. म्हातारीने मोठ्या भगूल्यात चुलीवर पाणी ठेवले. गरम झाल्यावर ती ते भगुले घेऊन बैलांजवळ गेली शेणाने माखलेले त्यांचे अंग साफ केले. त्यांना धुवून स्वच्छ केले. लिंबा म्हाताऱ्याने त्यांच्या शिंगांना रंग दिला. त्यांच्या नाकात नवीन वेसण घातल्या. त्यांना पोळ्याला आणलेल्या नवीन घागरमाळा घातल्या. बैलांचा शेवटचा दिवस म्हणून, म्हातारीने त्यांच्या तोंडात गोड घालण्यासाठी पूरण पोळ्या करून दोघांनाही चारल्या. सकाळीच सारे काम आटपून दोघेही बैलांना घेऊन हिंगोलीच्या दिशेने रवाना झाले.

सूर्य हळूहळू वर चढत होता तसे लिंबा म्हातारा अन् म्हातारी हिंगोलीचे अंतर घाईघाईत कापत होते. एक दोन तीन चार गाव पालथे घालीत लिंबा म्हातारा अन् म्हातारी सकाळी अकराच्या सुमारास हिंगोलीत दाखल झाले. अठरा, वीस किलोमीटरचे अंतर कापून दोघेही थकले होते म्हणून एक चहाचे दुकान बघून, दोघेही चहा पिण्यासाठी अन् क्षणभर विश्रांती घेण्यासाठी तिथे थांबले. दोघेही थोडावेळ तिथे बसले चहा पिला म्हाताऱ्याने चिलम ओढली आणि बाजारांच्या दिशेने निघण्याआधी त्या दोन्हीही बैलांना एकदा शेवटचे मनभरून बघू लागला, कारण, आता हे दोन्हीही बैल त्याला कधीच दिसणार नव्हते. ज्या बैलांने आपल्याला सूखा दुखात साथ दिली आज आपण मात्र आपल्या सुखासाठी त्यांना विकतो दोघेही डोळ्यातून अश्रू गाळीत बैल बाजारांच्या दिशेने निघाले. बाजारात बैलांची तुडुंब गर्दी झाली होती. यंदा दुष्काळाचा चटका फक्त, लिंबा म्हाताऱ्यालाच लागला नव्हता तर त्या जिल्ह्यातील साऱ्याच शेतकऱ्यांना लागला होता. यंदा जर स्वतः शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी आली तर बैलांना कोण पाळणार ?जर माणसांनाच प्यायला पाणी नाही तर, बैलांना कुठून पाणी आणायचे ? या विचारांने जिल्ह्यातील पुष्कळ शेतकऱ्यांने लिंबा म्हाताऱ्या सारखाच बैल विकण्याचा पर्याय निवडून बैल विकायला बाजारात आणले होते. लिंबा म्हातारा ज्या वेळेस बैल विकत घेण्यास बाजारात आला होता, तेंव्हाचे चित्र वेगळे होते. तेंव्हा बैल कमी आणि ग्राहक जास्त होते आज मात्र सारे बैलच दिसत होती. बैलांना विकत घेणारा ग्राहक दूरदूरपर्यंत दिसत नव्हता. लिंबा म्हातारा अन् म्हातारी त्या बैल बाजाराच्या एका कोपऱ्यात आपले बैल घेऊन बसले होते. आणि दूरदूरपर्यंत नजर फिरवत होते. एखाद्या ग्राहकासाठी. त्यांच्या मनात एकच विचार येत होता. कुणीतरी यावं. आमची बैल जोड़ पसंद करावी. सौदा

करावा. आणि आम्हांला पैसे देऊन येथून मोकळे करावे. याच आशेने ते दोघे बसले होते, बिना पाण्याचे बिना भाकरीचे एका बैल विकत घेणाऱ्या ग्राहकाची वाट बघत.

*************************************************************************

*रात दिस मेहनत करी*
*खाई कष्टाची भाकरी*
*पोसतो हि दुनिया सारी*
*बाप माझा शेतकरी !!*

*त्याला साऱ्या दुनियाचा घोर*
*म्हणून खाई अर्धीच भाकर*
*जगा देतो तो पोटभर*
*ना त्याला सुख तिळभर*
*त्याच्याच कष्टाच खाती सारी*
*बाप माझा शेतकरी !!*

*त्याच्या मुळेच सार जग*
*ना दिसती त्याच कुणा दुःख*
*त्याचच खाऊन, सर्वा सुख*
*त्याच्याच नशिबी आलाय भोग*
*रात दिस ढेकळात मरी*
*बाप माझा शेतकरी !!*

*काळ्या मातीची त्याची खाणं*
*राबी त्याच्यात विसरून भान*
*घेऊन वाड वडिलाची आण*
*काढी त्यातून हिरवं सोन*
*नसे त्याला किमत जरी*
*बाप माझा शेतकरी*
*बाप माझा शेतकरी !!*

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी. आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला अर्धाकोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाटत. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटगत सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा. हे सर्व मोफ़त आहे.